रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, २० जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन



**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून (दि. २०) सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी १०.१५ वाजता संसद भवनातील 'हंस द्वार' येथे माध्यमांशी संवाद साधण्याची शक्यता आहे. हे अधिवेशन २० जुलै ते १३ ऑगस्ट या कालावधीत चालणार आहे. पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मांडणार आहे. परकीय अंशदान (नियमन) दुरुस्ती विधेयकाद्वारे परकीय देणगीच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण न झाल्यास किंवा मुदत संपल्यास ते रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय परकीय देणगी आणि मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी एक विशेष अधिकार मंडळ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

अंतरंग
पंढरीच्या वाटेवर आरोग्याचा सेवायज्ञ/२
भंगार व्यावसायिकाकडे खंडणी प्रकरणात महिलेला अटक/६
फिफा विश्वचषकात इंग्लंडने साकारला दमदार विजय/८

# डॉक्टरांचा राज्यव्यापी संप अखेर मागे

## रुग्णांना मोठा दिलासा



**ठाणे : प्रतिनिधी**

डोंबिवलीतील डॉक्टर मारहाण प्रकरणाच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) पुकारलेला राज्यव्यापी संप अखेर मागे घेण्यात आला आहे. याप्रकरणी राज्य सरकारने बजावलेली भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील मुख्य आरोपीचा जामीन रद्द केल्यानंतर आयएमएने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यभरातील रुग्ण, त्यांच्या नातेवाइकांसह आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला आहे.

संप मागे घेतल्यामुळे आता ओपीडी सेवा, नियमित तपासण्या आणि इतर वैद्यकीय सेवा पूर्ववत सुरू होणार आहेत, मात्र डॉक्टरांच्या सुरक्षेसह इतर प्रलंबित मागण्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी आयएमएने केली आहे. डोंबिवलीतील डॉक्टरांवरील मारहाणीच्या घटनेनंतर राज्यभरातील डॉक्टरांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या घटनेच्या निषेधार्थ आयएमएने राज्यव्यापी संपाची घोषणा केली होती.

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी रमेश म्हात्रे यांचा जामीन मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला. न्यायालयाच्या या निर्णयानंतर आयएमएच्या पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक झाली. आरोपीविरोधात कायदेशीर कारवाई योग्य दिशेने सुरू असल्याचे लक्षात घेऊन डॉक्टरांनी आपला संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉक्टरांच्या संपामुळे ओपीडी सेवा, नियमित तपासण्या, नियोजित उपचारांवर परिणाम होण्याची शक्यता होती, मात्र संप मागे घेतल्याने सरकारी व खासगी रुग्णालयांमधील वैद्यकीय सेवा सुरळीत सुरू राहणार असून हजारो रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

# खानावचे शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाला पुन्हा एकदा मोठा राजकीय धक्का बसला आहे. तालुक्यातील खानाव येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि खंदे समर्थक भाऊशेठ पाटील यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबीयांसह आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचे कमळ हाती घेतले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात शनिवारी (दि. १८) हा दिमाखदार पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाऊशेठ पाटील यांच्यासह भाजपमध्ये दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात अगत्याने स्वागत केले. भाऊशेठ पाटील यांनी जो विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला आहे, तो विश्वास पक्षसंघटनेच्या माध्यमातून पूर्णपणे सार्थ ठरवला जाईल, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी दिली. या पक्षप्रवेशामुळे खानाव परिसरासह संपूर्ण पनवेल तालुक्यात भाजपची ताकद आणखी मजबूत झाली आहे. या सोहळ्याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सुरू असलेल्या धडाकेबाज विकासकामांच्या जोरावरच नागरिकांचा पक्षावरील आणि नेतृत्वावरील विश्वास अधिक घट्ट झाल्याचे सांगितले. विरोधकांकडून होणाऱ्या प्रत्येक टीकेला भाजपने नेहमीच भाषणाबाजीने नव्हे, तर थेट जमिनीवरील विकासकामांच्या माध्यमातून सडेतोड उत्तर दिले आहे, असे सांगत ही विकासकामांची मालिका यापुढेही अविरतपणे सुरूच राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटील कुटुंबीयांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी खानावचे माजी सरपंच दत्तात्रेय पाटील, माजी उपसरपंच ताईबाई पाटील, माजी ग्रामपंचात सदस्य जयश्री पाटील, तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, जनार्दन पाटील, अ‍ॅड. दिनेश पाटील, प्रतीक्षा पाटील, विठ्ठल पाटील, वासुदेव पाटील, मारुती पाटील, पंडित पाटील, कुंडलिक पाटील, लता पाटील, मोहिनी पाटील, अस्मिता पाटील, प्रज्ञा पाटील, सुरेखा पाटील, रंजना पाटील, स्नेहा पाटील, अर्चना पाटील, वंदना पाटील, विद्या पाटील यांच्यासह पाटील कुटुंबीयांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या (**पान २ वर**)

# विश्रांतीनंतर रायगड जिल्ह्यात पावसाचे दमदार पुनरागमन



## शेतकरी सुखावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर रायगड जिल्ह्यात पावसाने पुन्हा दमदार हजेरी लावली आहे. रविवारी (दि. १९) पहाटेपासून जिल्ह्यातील सर्वच भागात पावसाने दमदार हजेरी लावली. त्यामुळे शेतीच्या कामांना आता वेग येणार आहे.

मागील दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते. अधूनमधून पावसाची एखादी सर कोसळत होती, मात्र रविवारी अलिबाग, पेण, पनवेल, उरण, रोहा, माणगाव, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन, मुरूड, तळा, सुधागड, कर्जत आणि खालापूर तालुक्यांसह बहुतांश भागात मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने भात लागवडीनंतरची अनेक शेतीकामे खोळंबली होती. पाण्याअभावी काही ठिकाणी भातरोपांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती, मात्र नव्याने झालेल्या पावसामुळे भातशेतीला आवश्यक ओलावा मिळाला असून तणनियंत्रण, खत व्यवस्थापन आणि इतर शेतीकामांना पुन्हा वेग येणार आहे.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रायगड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भात रोपवाटिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. काही भागात शेती पाण्याखाली गेली होती, तर शेतकऱ्यांना नव्याने रोपवाटिका तयार करण्याची वेळ आली होती. त्यानंतर पावसाने अचानक विश्रांती घेतल्याने शेतीचे नियोजन विस्कळीत झाले होते.

आता पुन्हा पावसाने दमदार पुनरागमन केल्याने खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाली आहे.

## अंबरनाथमध्ये होर्डिंग लावताना एकाचा मृत्यू

**अंबरनाथ : प्रतिनिधी**

अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीत होर्डिंग उभारण्याचे काम सुरू असताना झालेल्या अपघातात २४ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. मृत कामगाराचे नाव इंद्रेश राजभर (२४) असे आहे. तो ठाण्यातील बाळकुम परिसरातील रहिवासी होता.

प्राथमिक माहितीनुसार अंबरनाथमध्ये लोखंडी होर्डिंग बसवण्याचे काम सुरू असताना इंद्रेश लोखंडी सळई हलवत होता. त्यावेळी सळईचा संपर्क जवळून गेलेल्या उच्चदाबाच्या वीजवाहिनीशी आला. त्यामुळे त्याला जोरदार विजेचा धक्का बसला आणि तो घटनास्थळीच गंभीर जखमी झाला. सहकाऱ्यांनी त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

## इर्शाळगड-प्रबळगडदरम्यान भरकटलेल्या ट्रेकर्सची थरारक सुटका

**खालापूर, पनवेल, चौक : वार्ताहर**

इर्शाळगडावरून माची प्रबळगडाच्या दिशेने ट्रेकसाठी निघालेल्या ठाण्यातील १३ तरुणांची घनदाट जंगलात भरकटल्याने सुटका करण्यात आली आहे. स्थानिक पोलीस आणि बचाव पथकाने रात्रभर शोध मोहीम राबवून सर्वांना सुखरूप बाहेर काढले.

अंधार पडू लागलेला, मोबाइल नेटवर्क बंद, खोल दऱ्या, निसरडे कातळ आणि जीवघेण्या वाटांमुळे ट्रेकर्स गंभीर संकटात सापडले होते. अखेर आपत्कालीन ११२ क्रमांकावर मदतीचा कॉल प्राप्त होताच तातडीने बचाव मोहीम हाती घेण्यात आली.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट मार्शल-४ वरील नितीन सोनवणे व प्रदीप पोपटे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत माची प्रबळ गावातील अनुभवी वाटाडे नवनाथ पारधी, (**पान २ वर**)

## राजौरी-पूंछमध्ये ढगफुटी; १० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरच्या राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पुरामुळे आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक बेपत्ता आहेत. हवामान विभागाने या भागात आणखी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि डोंगराळ भागात



ढगफुटी झाल्याने राजौरी जिल्ह्यात अचानक पूर आला.

दारहाली नदीच्या किनाऱ्यावरील संरक्षक भिंत कोसळल्याने बस स्थानकासह आसपासच्या परिसरात पाणी शिरले. रस्त्यावर उभी असलेली शेकडो वाहने पाण्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेली. बेला कॉलनीसारख्या सखल भागात पाणी साचल्याने रस्ते जलमय झाले आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून शेकडो कुटुंबांना सुरक्षित स्थानी हलवण्यात आले आहे. हवेली भागात सात घरांचे नुकसान झाले आहे.

## नागालँडमध्ये भूस्खलनात आठ जणांचा मृत्यू

**कोहिमा : वृत्तसंस्था**



नागालँडमधील मोन जिल्ह्यातील डिफेन्स कॉलनीमध्ये भूस्खलन झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक घरे वाहून गेली. भूस्खलनामुळे झालेल्या दुर्घटनेत आठ लोकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत चार मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, आसाम रायफल्स आणि पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली. सध्या बचावकार्य वेगाने सुरू आहे.


## निवडक

### युजर्सना मिळाला दिलासा! फेसबुकची सेवा पुन्हा सुरू

**नवी दिल्ली :** जगभरातील युजर्सना आऊटेजचा फटका बसल्यानंतर अखेर फेसबुकची सेवा रविवारी पूर्ववत करण्यात आली. सकाळी अनेक ठिकाणी फेसबुक डाऊन झाले होते. आता फेसबुक पुन्हा सुरळीत झाले असून युजर्स पूर्वीप्रमाणेच लॉग इन करून पोस्ट, मेसेज आणि फीड वापरू शकत आहेत, मात्र फेसबुक अचानक का डाऊन झाले होते याबाबत कंपनीकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

### सोनम वांगचूक यांना रुग्णालयात दाखल करणे योग्यच : न्यायालय

**नवी दिल्ली :** पर्यावरण कार्यकर्ते सोनम



वांगचूक दिल्लीतील जंतरमंतरवर मागील २१ दिवसांपासून उपोषणाला बसले होते, मात्र सोनम वांगचूक यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत असल्याने १८ जुलै रोजी दिल्ली पोलिसांनी त्यांना उपोषणस्थळावरून रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकारानंतर पोलीस प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली होती. दरम्यान, याबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने आपले एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सोनम वांगचूक यांना रुग्णालयात दाखल करणे ही कृती म्हणजे पोलिसांची मनमानी नसून योग्यच होते, असे म्हटले आहे.

# ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषात इंदापुरात दिमाखदार अश्वरिंगण

**इंदापूर : प्रतिनिधी**

"हेची व्हावी माझी आस... पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील भक्तिभाव प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला तो इंदापुरातील दिमाखदार अश्वरिंगण सोहळ्यात. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत आलेल्या लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत, 'ज्ञानबा-तुकाराम'च्या अखंड जयघोषात आणि मेघांच्या साक्षीने अश्वरिंगणाचा अविस्मरणीय सोहळा रंगला. रिंगण संपताच वरुणराजानेही हजेरी लावत भक्तिरसात चिंब भिजवले.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर रिंगण सोहळा पार पडला. सकाळी दहापासूनच भाविकांनी मैदानावर गर्दी केली होती. नियोजित वेळेपेक्षा काहीशी उशिराने निमगाव केतकी येथून संत तुकाराम महाराजांची पालखी श्रीराम वेशीत दाखल झाली. नगराध्यक्ष भरत शहा, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, प्रांताधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार जीवन बनसोडे, भाजप नेते प्रदीप गारटकर, जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील, माजी नगराध्यक्षा अंकिता शहा, सचिन खुडे, मुख्याधिकारी रमेश ढगे, महारुद्र पाटील, माउली चवरे, कैलास कदम, पोपट शिंदे, अनिकेत वाघ, स्वप्निल राऊत, विठ्ठल ननवरे आणि श्रीधर बाब्रस यांनी पालखीचे स्वागत केले.

रिंगण मैदानावर पालखी पोहचताच समस्त भाविकांच्या उपस्थितीत 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषात रिंगण सोहळ्यास प्रारंभ झाला. नगारखान्याची प्रदक्षिणा, मानाच्या अश्वाची रिंगण पाहणी, झेंडेकरी, वीणेकरी, हंडेकरी, तुळशी वाहणाऱ्या भगिनी तसेच पखवाजवादकांच्या प्रदक्षिणेनंतर पोलीस कर्मचारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही रिंगणात धावण्याचा मान मिळाला. त्यानंतर मानाच्या अश्वाने प्रदक्षिणा पूर्ण करताच दोन्ही अश्वांनी वेगाने परिक्रमा सुरू केली. टाळ-मृदुंगांचा निनाद, भगव्या पताकांची सळसळ, अश्वांच्या टापांमधून उधळणारी लाल माती आणि 'ज्ञानबा-तुकाराम'चा गजर यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि रोमांचकारी झाले होते.





# अरबी समुद्रातील उच्च भरतीच्या ऑरेंज अलर्टमुळे मच्छीमारांना सतर्कतेचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

अरबी समुद्रात महाराष्ट्राच्या किनारपट्टीसाठी उच्च भरतीचा (High Tide) २४ तासांचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्याने मच्छीमार आणि किनारपट्टीवरील नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

अरबी समुद्रात कमी तीव्रतेचा भूकंपामुळे कोणताही समुद्री धोका निर्माण झालेला नसला, तरी उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाणे टाळावे, किनाऱ्यावर उभ्या असलेल्या नौका, ट्रॉलर आणि मासेमारी साहित्य सुरक्षितपणे बांधून ठेवावे, तसेच किनारपट्टीवरील नागरिक, पर्यटक आणि लहान मुलांनी समुद्रकिनाऱ्यावर किंवा खडकाळ भागात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.याशिवाय, स्थानिक मत्स्यव्यवसाय विभाग, किनारी प्रशासन आणि अधिकृत हवामान विभागाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

प्राप्त माहितीनुसार, शनिवारी सकाळी अरबी समुद्रात वसई–विरार किनारपट्टीपासून सुमारे ५७ किलोमीटर अंतरावर, ५ किलोमीटर खोलीवर कमी तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला असला, तरी त्सुनामीचा कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजून ३३ मिनिटांनी रिश्टर स्केलवर ३.२ तीव्रतेचा भूकंप नोंदविण्यात आला.

या भूकंपाचे धक्के जमिनीवर कुठेही जाणवले नसून कोणतीही हानी झाल्याची नोंद नाही. तसेच इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस (INCOIS) यांनी त्सुनामीचा कोणताही इशारा किंवा अलर्ट जारी केलेला नसल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने हो स्पष्ट केले आहे.

समुद्रात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास भारतीय तटरक्षक दलाच्या १५५४, किनारी सुरक्षा हेल्पलाईन १०९३ तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या १०७० या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खोपोलीत भाजपतर्फे स्मार्ट कार्ड शिबिर



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष व ज्येष्ठ नागरिक सभा यांच्या विद्यमाने ज्येष्ठ नागरिका सभागृहात रविवारी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली.हे शिबिर भाजपच्या नगरसेविका अश्विनीताई यात्रे यांच्या विशेष सहकार्याने झाले शिबिराचे उद्घाटन भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर ,ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष रवींद्र घोडके यांनी केले, या शिबिराला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी भेट देऊन कार्यकर्त्यांची कौतुक केले. यावेळी नगरसेविका अश्विनीताई अत्रे, प्रतीक्षा रेटरेकर, सानिया शेख, शहर सरचिटणीस विनायक माडपे, विकास खुरपडे, कार्यकर्ते दिलीप पवार, सुरेन जाधव, महिला आघाडीच्या सुनिता महर्षी, सुजाता मोहिते उपस्थित होते.

## ‘पंढरीच्या वाटेवर आरोग्यसेवेचा भक्तिमय सेवायज्ञ’

**नवी मुंबई : बातमीदार**



"आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, भक्तीचा आणि सेवाभावाचा जिवंत पुरावा होय." विठ्ठलनामाचा अखंड गजर करत लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत असताना, त्यांच्या आरोग्याची जबाबदारी भक्तीभावाने स्वीकारत नवी मुंबईतील श्री विश्वमाऊली वारकरी सेवा संस्था, गेल्या २०१० पासून अविरतपणे आरोग्यसेवेचा सेवायज्ञ राबवत आहे.

या संस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे येथे एकत्र आलेली माणसे. समाजात प्रतिष्ठेची ओळख असलेले सुप्रसिद्ध डॉक्टर, फार्मासिस्ट, उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील उच्चशिक्षित, सुशिक्षित व्यक्ती या सेवाकार्यात सहभागी होतात. मात्र वारीत प्रवेश करताच त्यांच्या पदव्या, व्यवसाय आणि सामाजिक ओळखी मागे पडतात. तेथे ते केवळ "वारकऱ्यांचे सेवेकरी" असतात.

संतांनी शिकविलेली भक्ती ही केवळ टाळ–मृदंगात नसून, ती दुःखी आणि गरजूंच्या सेवेत आहे. "नरसेवा हीच नारायण सेवा"हा विचार श्री विश्वमाऊली वारकरी सेवा संस्थेच्या प्रत्येक उपक्रमातून जिवंत होताना दिसतो. संत तुकाराम महाराजांचे "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले" हे वचन ही संस्था कृतीतून साकार करत आहे.

वारीच्या प्रदीर्घ प्रवासात थकलेल्या पावलांना बळ देणे, वेदनांनी त्रस्त झालेल्यांना दिलासा देणे आणि गरजू वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, हेच या संस्थेचे ध्येय बनते. वैद्यकीय तपासणी, आवश्यक औषधांचे निःशुल्क वाटप, विविध उपचार पद्धती, हात–पायांची मालिश, तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन अशा अनेक सेवा संस्थेच्या माध्यमातून सातत्याने दिल्या जातात. या सेवेमुळे अनेक वारकरी नव्या उत्साहाने पुन्हा पंढरीच्या वाटेवर निघतात.

यंदा श्री विश्वमाऊली वारकरी सेवा संस्थेने वारकऱ्यांच्या सेवेचे सलग सोळावे वर्ष पूर्ण केले आहे. भक्ती, माणुसकी आणि वैद्यकीय सेवेचा सुंदर संगम घडविणाऱ्या या सेवायज्ञातून संस्था निःस्वार्थ भावनेने वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत आहे.

## कळंब प्राथमिक आरोग्य केंद्राची ऐतिहासिक कामगिरी ; एका वर्षात १७० कायमस्वरूपी नसबंदी शस्त्रक्रिया

**नेरळ : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील अतिदुर्गम कळंब परिसरातील ग्रामीण नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविताना कौटुंबिक नियोजनाच्या क्षेत्रात कळंब प्राथमिक आरोग्य केंद्राने ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. गेल्या एका वर्षात केंद्रामार्फत एकूण १७० कायमस्वरूपी नसबंदी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या असून, त्यामध्ये १६९ महिला नसबंदी (ट्युबल लायगेशन) आणि १ पुरुष नसबंदी (व्हॅसेक्टॉमी) शस्त्रक्रियेचा समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर रायगड जिल्ह्यात सर्वाधिक नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचा मान कळंब प्राथमिक आरोग्य केंद्राने मिळवला आहे.

अतिदुर्गम ग्रामीण भागात महिलांपर्यंत आणि कुटुंबांपर्यंत सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व अत्याधुनिक कौटुंबिक नियोजन सेवा पोहोचविण्याचे हे उत्कृष्ट उदाहरण मानले जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर एवढ्या मोठ्या प्रमाणात शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होणे ही आरोग्य विभागासाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे.या यशामागे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. ऑपरेशन थिएटर (OT) सुरू करण्यापासून ते संपूर्ण वर्षभर आरोग्य पथकाचे मनोबल उंचावण्याचे काम त्यांनी केले.प्रत्यक्ष शस्त्रक्रियांची जबाबदारी सर्जन डॉ. प्रताप गुनजोंटे यांनी समर्थपणे पार पाडली, तर संपूर्ण नियोजनाची धुरा वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री पगारे आणि डॉ. विशाल केवारी यांनी सांभाळली. प्रत्येक शस्त्रक्रिया सुरक्षित, यशस्वी आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पार पडावी यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.

या यशामध्ये एलएचव्ही कल्पना शिर्के, सर्व आरोग्य सहाय्यक, स्टाफ नर्स, एएनएम, एमपीडब्ल्यू कर्मचारी, लॅब टेक्निशियन रोशन जाधव, फार्मासिस्ट अक्षय अहिरे, अॅम्ब्युलन्स चालक गणेश मणकामे तसेच वर्ग–४ कर्मचारी यांनी मोलाची भूमिका बजावली. तसेच बीएफ आणि आशा सेविकांनी गावागावात जनजागृती, समुपदेशन आणि लाभार्थींना आरोग्य केंद्रापर्यंत आणण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

ग्रामीण भागातील महिलांपर्यंत आधुनिक शस्त्रक्रिया सुविधा पोहोचवत सुरक्षित मातृत्व आणि नियोजित कुटुंब संकल्पना प्रभावीपणे राबविणाऱ्या कळंब प्राथमिक आरोग्य केंद्राच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून डॉक्टर, अधिकारी आणि संपूर्ण आरोग्य पथकावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# प्रसिद्ध हावरे प्रॉपर्टीजच्या संचालकांना ३० लाखांचा सायबर गंडा

**नवी मुंबई : बातमीदार**

सायबर गुन्हेगारांकडून व्हॉट्सअॅपवरील छायाचित्र (डीपी) आणि नावाचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक करण्याच्या घटना वाढत असतानाच नवी मुंबईतील नामांकित बांधकाम व्यावसायिकांच्या कंपनीलाही अशाच पद्धतीने लक्ष्य करण्यात आले आहे. प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सुरेश हावरे यांचे सुपुत्र तसेच ‘हावरे प्रॉपर्टीज’चे संचालक अमर हावरे यांच्या नावाचा आणि व्हॉट्सअॅप डीपीचा वापर करून सायबर चोरट्यांनी कंपनीची तब्बल ३० लाख रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर गुन्हेगाराने प्रथम अमर हावरे यांचा मूळ मोबाईल क्रमांक ब्लॉक केला. त्यानंतर दुसऱ्या मोबाईल क्रमांकावर अमर हावरे यांचे नाव आणि त्यांचा व्हॉट्सअॅप डीपी वापरून बनावट व्हॉट्सअॅप प्रोफाइल तयार केले. या बनावट खात्यावरून १४ जुलै रोजी दुपारच्या सुमारास हावरे प्रॉपर्टीजच्या अधिकृत कार्यालयाच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संदेश पाठविण्यात आले.

या संदेशांमध्ये स्वतः अमर हावरे बोलत असल्याचा भास निर्माण करण्यात आला. कंपनीच्या कामाशी संबंधित अत्यंत तातडीचे आर्थिक व्यवहार असल्याचे सांगत वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये त्वरित निधी वर्ग करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संदेशातील भाषा, संवादाची पद्धत आणि अमर हावरे यांचा डीपी असल्याने कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कोणताही संशय आला नाही.

त्यामुळे वाशी येथील हावरे प्रॉपर्टीजच्या कार्यालयात लायझनिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असलेले हेमंत काटकर (४८) यांनी वरिष्ठांकडूनच सूचना आल्याचा समज करून कंपनीच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने एकूण ३० लाख रुपये संबंधित बँक खात्यांमध्ये वर्ग केले.काही वेळाने अमर हावरे यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधल्यानंतर असे कोणतेही व्यवहार करण्याचे निर्देश त्यांनी दिले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर व्हॉट्सअॅपवरील प्रोफाइल बनावट असल्याचे उघडकीस आले आणि कंपनीची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे समोर आले.फसवणुकीची खात्री होताच हेमंत काटकर यांनी तातडीने राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर ऑनलाइन तक्रार दाखल केली.

त्यानंतर वाशी पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगाराविरोधात भारतीय न्याय संहितेतील फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सायबर पोलिसांनी संबंधित बँक खात्यांची माहिती, व्यवहारांचा मागोवा, वापरण्यात आलेले मोबाईल क्रमांक, आयपी पत्ते आणि इतर तांत्रिक पुरावे तपासण्यास सुरुवात केली असून, फसवणुकीची रक्कम ज्या खात्यांमध्ये जमा झाली त्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# देशाच्या पहिल्या हायड्रोजन ट्रेनमध्ये माणगावच्या अनिकेत येरुणकरचे योगदान



**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वेच्या इतिहासात हरित आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने टाकल्या जाणाऱ्या महत्त्वपूर्ण पावलांपैकी एक असलेल्या देशातील पहिल्या 'हायड्रोजन ट्रेन' प्रकल्पात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU), लोणेरे येथील माजी विद्यार्थी आणि माणगाव तालुक्यातील निजामपूर जवळील कोस्ते येथील अनिकेत येरुणकर यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानामुळे महाराष्ट्राच्या तंत्रशिक्षणाचा देशपातळीवर गौरव झाला आहे.

अनिकेत येरुणकर हा माणगाव तालुक्यातील कोस्ते या गावचा रहिवासी असून त्यांच्या या यशामुळे माणगाव, विद्यापीठासह संपूर्ण राज्याला अभिमान वाटत आहे. कार्बनमुक्त, पर्यावरणपूरक आणि आधुनिक वाहतूक व्यवस्थेच्या दिशेने भारत झेपावत असताना या ऐतिहासिक प्रकल्पात महाराष्ट्रातील विद्यार्थ्याने बजावलेली भूमिका राज्यातील गुणवंत युवकांची क्षमता आणि तांत्रिक कौशल्य अधोरेखित करणारी ठरली आहे. संशोधन, नवकल्पना आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील विद्यार्थी देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचा हा प्रेरणादायी पुरावा मानला जात आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अनिकेत येरुणकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की,"उद्योगांना आवश्यक असलेले कुशल, सक्षम आणि जागतिक दर्जाचे मनुष्यबळ घडविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. अनिकेत यांचे यश हे महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या कार्यामुळे राज्याच्या तंत्रशिक्षणाचा देशभर सन्मान वाढला आहे."

यावेळी त्यांनी अनिकेत येरुणकर यांच्या या यशामागे मोलाची भूमिका बजावणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील प्राध्यापकांचे, संशोधकांचे आणि संपूर्ण विद्यापीठ परिवाराचेही विशेष अभिनंदन केले. अशा गुणवंत विद्यार्थ्यांमुळे महाराष्ट्र ज्ञान, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाचे नेतृत्व करण्यास सक्षम ठरत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अनिकेत येरुणकर यांचे हे यश केवळ वैयक्तिक नसून महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना संशोधन, नवतंत्रज्ञान आणि राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात सहभागी होण्याची नवी प्रेरणा मिळणार आहे. त्याच्या यशामुळे कोस्ते, माणगाव आणि रायगडचे उज्ज्वल झाले आहे.

## पान १ वरुन

### खानावचे शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, कमला देशेकर, निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या अस्मिता पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, अतुल घरत, माजी सरपंच गणू मुंढे, एकनाथ फराड, शशिकांत दिसले, बळीराम भोईर, दीपकशेठ तवले, गणेश तातरे, सुनील फराड, समीर मुंढे, निलेश वारदे, दिलीप तवले, विलास भोपी, विजय मुंढे, सचिन दिसले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

### इर्शाळगड–प्रबळगडदरम्यान भरकटलेल्या ट्रेकर्सची थरारक सुटका

हरिश्चंद्र पारधी व नथुराम पारधी, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी व सात पोलीस अंमलदार, निसर्ग मित्र संस्थेचे सचिन शिंदे, वरद पवार, हेमंत वैद्य व अक्षय देशमुख तसेच हेल्प फाउंडेशनचे रेस्क्यूअर्स या बचाव मोहिमेत सहभागी झाले.

बचाव पथकाने स्वतःचा जीव धोक्यात घालत शोधमोहीम सुरू ठेवली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर भरकटलेल्या ट्रेकर्सपर्यंत पोहचून त्यांना सुरक्षित मार्गाने एकामागोमाग एक खाली आणण्यात यश आले. आदित्य विचारे, प्रकाश सावंत, यतीन कालिया, ऋतुराज पाटील, अंकित मिश्रा, दीपक बनकर, अभिषेक बहादूरकर, दीपक महतो, अनिकेत दुबे, चेतन शिंदे, राहुल बनकर, प्रशांत पांचोरे आणि रोहित कुमार या सर्वांची सुखरूप सुटका करण्यात आली.

## सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयात सीडबॉल रोपण

**तळा : प्रतिनिधी**



छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित सरस्वती विद्या मंदिर वडघर मुद्रे आणि वनविभाग माणगाव –क्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेचे सीट बॉल उपक्रम कार्यक्रमांतर्गत सीड बॉल रोपण करण्यात आले.


या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे सदस्य बाबाजी रिकामे, माणगाव क्षेत्राचे वनपाल नारायण जाधव , वनरक्षक संतोष पिंगळा , श्री.उत्तेकर वनरक्षक पवन चौधरी, वनसेवक गणेश शिर्के माझी विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते. वनपाल नारायण जाधव यांनी शाळेच्या निसर्गरम्य परिसराचे कौतुक केले. या निसर्गरम्य परिसरात सिडबॉल रोपण केल्यामुळे अधिकची वृक्ष,झाडे हे वाढू लागतील आणि त्यांचा संवर्धन होईल असा विश्वास व्यक्त केला.

वनरक्षक संतोष पिंगळा यांनी आपले मनोगत मांडताना सिडबॉल उपक्रमाची माहिती, सध्याची तापमान वाढ आणि पर्यावरणामधील बदल यावर मात करणारे ठरणार आहे. याकरिता झाडे लावूया झाडे जगऊया, कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठल पवार यांनी आपल्या मनोगतामध्ये सीडबॉल रोपणाचे महत्त्व सांगून उपस्थित सर्व मान्यवरांचे संस्थेच्या आणि शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले.

यानंतर सर्व विद्यार्थी व पाहुण्यांनी शालेय परिसरामध्ये प्रत्यक्ष सीटबॉल रोपण केले. विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि मान्यवर या सर्वांचे हस्ते शालेय परिसरामध्ये सिडबॉल रोपण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक गुजर यांनी केले .

## दुखवटा

### मोतीराम राऊत



**अलिबाग** : येथील जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल)मधील सेवानिवृत्त अधिकारी मोतीराम धोंडू राऊत यांचे शुक्रवारी (दि.१७) जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. राऊत यांच्या पश्चात एक विवाहित मुलगा, सुन, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे व गोकृपा अमृत विरजणाचे वाटप

## ■ रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या हस्ते वितरण

**पनवेल : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी विभागामार्फत यूएनडीपी (UNDP) योजनेअंतर्गत भात बियाण्यांचे वाटप, अन्न सुरक्षा अभियानांतर्गत तूर बियाण्यांचे वितरण तसेच गोकृपा अमृतचे विरजण वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद सदस्या अनन्या गाताडे, सरपंच मिनाक्षी जगताप आणि पोसरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच बंडू शिद यांच्या हस्ते संपन्न झाला.



कार्यक्रमास सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी मिनेश गाडगीळ तसेच प्रगतशील शेतकरी शांताराम मालूसरे, सुजित पाटील, जगदीश म्हसकर, संतोष भोसले आणि कैलास मालूसरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तालुका कृषी अधिकाऱ्यांनी प्रास्ताविक करून कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजनांची माहिती देऊन आधुनिक व शाश्वत शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

यावेळी अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी गुळसुंदे येथील शेतकरी प्रमोद विधवांस यांच्या शेताला भेट देऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) फळबाग लागवड तसेच भात रोपवाटिकेची पाहणी केली व त्याबाबत माहिती घेतली.

कार्यक्रमात सेंद्रिय शेती पुरस्कार प्राप्त शेतकरी मिनेश गाडगीळ आणि प्रगतशील शेतकरी सुजित पाटील यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेती, सेंद्रिय शेती आणि उत्पादनवाढीच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.यावेळी जानू भिकू गोठळ यांनी आकुळवाडी गावात राबविण्यात आलेल्या बांधबंदिस्तीच्या कामांमुळे तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गावातील भातशेती क्षेत्रात लक्षणीय वाढ झाल्याचे सांगितले. यासाठी त्यांनी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका कृषी अधिकारी भगवान हेगडे आणि सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद पाटील यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले. सहाय्यक कृषी अधिकारी प्रसाद पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. या कार्यक्रमास गुळसुंदे समूह ग्रामपंचायत परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे धानसर येथे विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने धानसर रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, ज्येष्ठ नेते चाहूशेठ पाटील, ओबीसी सेल अध्यक्ष नंदकुमार म्हात्रे, पनवेल तालुका मंडळाचे उपाध्यक्ष सुरेश पोरजी यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच राजेश तांबोळी, सुधाकर पाटील, अनंता पोरजी, गोमेश माळी, महेंद्र घरत, सदाशिव पोरजी आणि अक्रम शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजक पनवेल तालुका उत्तर मंडळ उपाध्यक्ष सुरेश पोरजी आणि प्रभाग १ सरचिटणीस जितेंद्र पोरजी होते. विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक वह्या उपलब्ध झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला.
उपस्थितांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे आभार मानले.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचा पदग्रहण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनर व्हील क्लब ऑफ पनवेलचा पदग्रहण सोहळा शनिवारी अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या सोहळ्यात नवनिर्वाचित अध्यक्षा अमृता नाईक आणि नवनिर्वाचित सचिव निशिगंधा पाटील यांच्यासह संपूर्ण एक्झिक्युटिव्ह टीमने अधिकृतपणे पदभार स्वीकारला.पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या सोहळ्याला विशेष उपस्थिती लावून नवनिर्वाचित कार्यकारणीला



पुढील सामाजिक कार्यासाठी प्रेरित केले तर डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉक्टर दीपशिखा पाठक या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्य पाहुण्या डॉक्टर दीपशिखा पाठक यांचे स्वागत पारंपरिक पद्धतीने औक्षण करून करण्यात आले, तसेच शरयू चिलेकर यांनी स्वतः रचलेले विशेष स्वागत गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी क्लबच्या महत्वपूर्ण सामाजिक कार्याचा आढावा घेणाऱ्या विशेष बुलेटिनचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, तसेच पीडीसी शोभना पालेकर यांचाही व्यासपीठावर विशेष गौरव करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी इनर व्हील क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत आपल्या उपस्थितीने सर्व महिला पदाधिकाऱ्यांचा उत्साह वाढवला. मुख्य पाहुण्या डॉक्टर दीपशिखा पाठक यांनी नवीन कार्यकारणीच्या सेवाभावी वृत्तीची प्रशंसा करत त्यांना आगामी वर्षातील सामाजिक प्रकल्पांसाठी आणि प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या दिमाखदार सोहळ्याला इनर व्हील क्लबचे सदस्य, विविध क्षेत्रांतील निमंत्रित आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिमये वाचनालयात सभा

**पनवेल** : येथील के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२६) सायंकाळी ५ वाजता आगरी समाज मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. यावेळी संस्थेच्या नवीन प्रस्तावित इमारतीमधील एक मजला विक्रीसंदर्भात मान्यता घेण्यासाठी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षपदी डॉ. जयश्री पाटील




**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचा सन २०२६२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीचा पदस्थापना समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.मान्यवरांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित अध्यक्षा रो.डॉ.जयश्री पाटील व सचिव रो.ॲड हितेश रजपूत यांनी पदाची शपथ घेत क्लबच्या नेतृत्वाची सूत्रे स्वीकारली.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे रोटरी प्रांतपाल नितीन धमाले, आमदार रो. प्रशांत ठाकूर विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष, सचिव,रोटेरियन्स तसेच सामाजिक,शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

नवनिर्वाचित अध्यक्षांनी आपल्या मनोगतात,आरोग्य,पर्यावरण संवर्धन,महिला व बालकल्याण, युवक सक्षमीकरण तसेच विविध समाजोपयोगी प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. सचिवांनी क्लबच्या आगामी वर्षातील उपक्रमांची माहिती देत सर्व सदस्यांच्या सहकार्याने सेवा प्रकल्प अधिक व्यापक करण्याचा विश्वास व्यक्त केला.समारंभात माजी पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच नवीन कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली.संपूर्ण कार्यक्रम उत्साह, मैत्रीभाव आणि या रोटरीच्या ब्रीदवाक्यानुसार सेवाभावाची नवचेतना निर्माण करणारा ठरला.

## गव्हाण फाटा-पनवेल मार्गावर भीषण अपघात

### सुमारे दोन कोटींचे नुकसान; परदेशातून आयात केलेले विद्युत ट्रक उड्डाणपुलाच्या लोखंडी संरचनेला धडकले

**पनवेलः वार्ताहर**

गव्हाण फाटा ते पनवेल मार्गावरील पाडेघर परिसरात एका ट्रेलर चालकाचा उंचीचा अंदाज चुकल्याने भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत ट्रेलरवर वाहतूक करण्यात येत असलेल्या परदेशातून आयात केलेल्या अत्याधुनिक विद्युत ट्रकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात उड्डाणपुलाचा कोणताही भाग कोसळल्यामुळे झालेला नसून, रस्त्यावरील ४.८ मीटर उंचीची मर्यादा लक्षात न घेतल्याने घडला. उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी उंचीची मर्यादा स्पष्टपणे दर्शविण्यात आली होती. मात्र, ट्रेलर चालकाने वाहून नेल्या जाणाऱ्या वाहनांच्या उंचीचा योग्य अंदाज न घेताच वाहन पुढे नेल्याने ही दुर्घटना घडली.

ट्रेलरवर 'सानी' कंपनीचे परदेशातून आयात केलेले दोन निळ्या रंगाचे विद्युत ट्रक लादलेले होते. उड्डाणपुलाच्या बांधकामस्थळी असलेल्या लोखंडी संरचनेला ट्रेलरवरील पहिल्या ट्रकचा वरचा भाग जोरदार धडकला. या धडकेमुळे पहिल्या ट्रकची संपूर्ण चालक केबिन उखडून मागे सरकली आणि ती दुसऱ्या ट्रकवर आदळली. परिणामी दोन्ही महागड्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने, ट्रक मजबूत सुरक्षा साखळदंडांनी ट्रेलरला बांधलेले असल्याने अपघातग्रस्त वाहने रस्त्यावर कोसळली नाहीत. अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. अपघातानंतर जेएनपीटी परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. पोलिस आणि मदत पथकाने क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त ट्रेलर रस्त्याच्या बाजूला हलविण्याचे काम हाती घेतले. प्राथमिक तपासात हा अपघात ट्रेलर चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे समोर आले असून पुढील तपास सुरू आहे.

## एमएनएम विद्यालयात स्व. मोरू नारायण म्हात्रे यांना अभिवादन!




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयात स्व. मोरु नारायण म्हात्रे यांच्या २१व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम श्रद्धापूर्वक संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. मोरू नारायण म्हात्रे यांच्या प्रतिमेस त्यांचे सुपुत्र तथा माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी त्यांच्या कार्याचा गौरव करत शिक्षण, समाजसेवा आणि सामाजिक विकासासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचे स्मरण करण्यात आले. एम.एन.एम. विद्यालयाला त्यांचे नाव लाभणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, अनंता म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, विजय घरत, वसंत पाटील, अनंता म्हात्रे, सरपंच विजय घरत, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, अनंता ठाकूर, कमलाकर देशमुख, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे तसेच ग्रुप ग्रामपंचायत गव्हाणचे उपसरपंच सचिन घरत, मीनाक्षी पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. यावेळी उपस्थितांनी स्व. मोरू नारायण म्हात्रे यांच्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावा, असा संदेश देत त्यांना अभिवादन केले.

## आज सिडकोतर्फे आयोजित डिसेंबर २०२५ मधील गृहनिर्माण योजनेची ऑनलाईन संगणकीय सोडत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोतर्फे डिसेंबर २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेची ऑनलाईन संगणकीय सोडत दिनांक २० जुलै रोजी काढण्यात येणार आहे. सदर गृहनिर्माण योजनेअंतर्गत नवी मुंबईतील विविध नोड्समध्ये १६,८७६ सदनिका (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) ८,७९५ व अल्प उत्पन्न गट (LIG) ८,०८१) उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या योजनेसाठी एकूण १९,५४८ अर्ज प्राप्त झाले आहेत.

तथापि, मा. उच्च न्यायालयाने रिट याचिकेवर दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने, सदर संगणकीय सोडत केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील ८,७९५ सदनिकांसाठी घेण्यात येणार आहे. या प्रवर्गासाठी एकूण १०,८३२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

सदर सोडत पूर्णपणे पारदर्शक व संगणकीकृत पद्धतीने घेण्यात येईल. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यशस्वी अर्जदारांची यादी सिडकोच्या अधिकृत गृहनिर्माण संकेतस्थळावर www.cidcohomes.com येथे प्रसिद्ध करण्यात येईल. लॉटरीचा निकाल तसेच पुढील वाटप प्रक्रियेबाबतची अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी अर्जदारांनी www.cidcohomes.com या संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

## लिफ्ट कोसळून कामगाराचा मृत्यू

**पनवेल :** बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून बांधकाम साहित्याच्या लिफ्टसह खाली कोसळून एका तरुण कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच उलवे येथे घडली. मुकेश कुमार रामनाथ (२३) असे मृत कामगाराचे नाव आहे.कामगारांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता गंभीर निष्काळजी केल्याने उलवे पोलिसांनी संबंधित बांधकाम व्यावसायिक आणि कंत्राटदार दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## सीबीएसई स्किल एक्स्पो अँड गाईडन्स फेस्टिव्हलमध्ये सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्स, नाशिक येथे आयोजित सीबीएसई स्किल एक्स्पो अँड गाईडन्स फेस्टिव्हलमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल (सीबीएसई), उलवे येथील विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील अभिनव प्रकल्प सादर करून आपली गुणवत्ता सिद्ध केली.



स्पर्धेतील कॅटेगरी-१ (इयत्ता ६ वी ते १० वी) अंतर्गत 'हेल्थ अँड वेलनेस' या विषयावर शिक्षिका अश्विनी मेघा यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ८ वीतील राजवर्धन नलगे व इयत्ता ७ वीतील अर्जुन चव्हाण यांनी उत्कृष्ट प्रकल्प सादर केला. तसेच याच विषयात इयत्ता ९ वीतील जय कुकरेजा व प्रत्यक्ष कारिया यांनीही आपल्या कल्पकतेचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे प्रभावी सादरीकरण केले. 'एन्व्हायर्नमेंट अँड सस्टेनेबिलिटी' या विषयावर शिक्षिका निशा गुलिया यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ९ वीतील अखिल राणा व हृदय गणेकर यांनी पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास या विषयांवर आधारित अभिनव प्रकल्प सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्ती, सर्जनशीलताआणि कौशल्याधारित शिक्षणाला चालना देणाऱ्या या उपक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या उल्लेखनीय सहभागाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मुक्ता खटावकर कौतुक केले.

## संपादकीय

# हरित रेल्वे युगाची सुरुवात

भारतीय रेल्वे केवळ देशाची जीवनवाहिनी राहिलेली नाही, तर आता ती पर्यावरणपूरक विकासाचे नवे प्रतीक बनत आहे. हरित ऊर्जेचा स्वीकार, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पायाभूत सुविधांचा वेगवान विकास यामुळे भारतीय रेल्वे नव्या युगात प्रवेश करत आहे. हरियाणातील जिंद येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरित रेल्वे प्रकल्पाला हिरवा झेंडा दाखवत या परिवर्तनाला नवी दिशा दिली आहे.

**भारतीय रेल्वे ही जगातील सर्वांत मोठ्या रेल्वे व्यवस्थांपैकी एक आहे. दररोज कोट्यवधी प्रवासी आणि लाखो टन मालाची वाहतूक करणारी ही व्यवस्था देशाच्या आर्थिक विकासाचा कणा मानली जाते. गेल्या काही वर्षांत रेल्वेने गती, सुरक्षितता आणि आधुनिक सुविधांबरोबरच पर्यावरण संरक्षणालाही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. त्यामुळे आज भारतीय रेल्वेचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा विस्तार नसून शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू झालेली व्यापक चळवळ आहे. या परिवर्तनाला अलीकडेच ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले. हरियाणातील जिंद येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील पहिल्या स्वदेशी हायड्रोजन-इंधनावर चालणाऱ्या रेल्वे प्रकल्पाला हिरवा झेंडा दाखवून हरित रेल्वे युगाची औपचारिक सुरुवात केली. 'मेक इन इंडिया'च्या संकल्पनेतून विकसित करण्यात आलेले हे तंत्रज्ञान भारताला स्वच्छ ऊर्जा वापरणाऱ्या प्रगत देशांच्या पंक्तीत उभे करणारे आहे. हायड्रोजनवर चालणारी रेल्वे कार्बन उत्सर्जनाऐवजी केवळ पाण्याची वाफ सोडत असल्याने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. जागतिक तापमानवाढ, हवामान बदल आणि वाढते प्रदूषण ही आजची गंभीर आव्हाने आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने २०७०पर्यंत 'नेट झिरो' कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. भारतीय रेल्वेने त्याआधीच २०३० पर्यंत 'नेट झिरो कार्बन एमिटर' होण्याचा संकल्प केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रेल्वे स्थानके, कार्यशाळा आणि कार्यालयांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प, पवनऊर्जा, एलईडी प्रकाशयोजना, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि ऊर्जा बचतीचे अनेक उपक्रम राबविले जात आहेत. हरित रेल्वेच्या दिशेने उचललेले सर्वांत महत्त्वाचे पाऊल म्हणजे रेल्वेमार्गांचे मोठ्या प्रमाणावर झालेले विद्युतीकरण. देशातील बहुतांश ब्रॉडगेज मार्गांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. त्यामुळे डिझेलवरील खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला असून कार्बन उत्सर्जनातही लक्षणीय घट झाली आहे. त्याचबरोबर रेल्वेचा वेग, वेळेचे नियोजन आणि कार्यक्षमताही वाढली आहे. भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणात वंदे भारत एक्स्प्रेस, अमृत भारत एक्स्प्रेस, आधुनिक एलएचबी डबे, 'कवच'सारखी स्वदेशी सुरक्षा प्रणाली आणि डिजिटल तिकीट व्यवस्था यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर होत आहे. रेल्वेच्या सेवांमध्ये डिजिटल परिवर्तनामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमताही वाढली आहे. रेल्वेस्थानकांचा कायापालट हे या परिवर्तनाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. स्वच्छता, आधुनिक प्रतीक्षालये, दिव्यांगांसाठी सुविधा, एस्केलेटर, लिफ्ट, डिजिटल माहिती प्रणाली आणि हरित ऊर्जा प्रकल्प यामुळे रेल्वेस्थानके अधिक आकर्षक आणि पर्यावरणपूरक बनत आहेत. भारतीय रेल्वे आज विकास, पर्यावरण आणि तंत्रज्ञान यांचा सुंदर समतोल साधत पुढे जात आहे. विद्युतीकरण, हायड्रोजन तंत्रज्ञान, आधुनिक रेल्वेगाड्या आणि जागतिक दर्जाच्या सुविधा यांच्या बळावर भारतीय रेल्वे विकसित भारताच्या स्वप्नाला नवी गती देत आहे. हरित रेल्वे युगाची ही सुरुवात केवळ रेल्वेच्या इतिहासातील नवा अध्याय नसून पर्यावरणपूरक आणि आत्मनिर्भर भारताच्या भविष्याचा भक्कम पाया आहे.**

# शेतकरी कर्जमुक्तीबाबतचे शंकानिरसन

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत कर्जमाफी, एकवेळ समझोता (OTS), नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ, पात्रता, अपात्रता, अर्ज प्रक्रिया, ॲग्रीस्टॅक नोंदणी, तक्रार निवारण आदी विविध बाबींविषयी शेतकऱ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. या सर्व प्रश्नांची अधिकृत व सोप्या भाषेतील उत्तरे एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने ही प्रश्नोत्तरे तयार करण्यात आली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज समजून घेता येईल आणि गैरसमजांनाही आळा बसेल

**कर्जमुक्तीबाबत शेतकऱ्यांना पडणारे प्रश्न आणि त्याची उत्तरे :**

१. या कर्जमुक्ती योजनेचे नाव काय आहे आणि ती कोणासाठी आहे?

उत्तर : या योजनेचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' असे आहे. ही योजना राज्यातील थकीत कर्ज असलेल्या आणि नियमित कर्ज भरणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी आहे.

२. या योजनेत माझे किती रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होईल?

उत्तर : तुमच्या पीक कर्जाची मुद्दल आणि व्याज मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची थकबाकी या योजनेत थेट माफ केली जाईल.

३. कोणत्या काळातील पीक कर्जाला ही माफी मिळेल?

उत्तर : तुम्ही १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या काळात घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज जर ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असेल आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत तुम्ही ते भरले नसेल, तर त्या कर्जालाही माफी मिळेल.

४. माझ्यावर २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असेल, तर मला लाभ मिळेल का?

उत्तर : होय, नक्की मिळेल. याला 'एकवेळ समझोता' (OTS) योजना म्हटले आहे. जर तुमचे कर्ज २ लाखांपेक्षा जास्त असेल, तर तुम्हाला २ लाखांच्या वरची अतिरिक्त रक्कम प्रथम बँकेत भरावी लागेल. ती अतिरिक्त रक्कम भरल्यावर शासन तुमच्या खात्यात २ लाख रुपये जमा करेल.

५. दोन लाखांवरील वरची रक्कम भरण्यासाठी माझ्याकडे लगेच पैसे नसतील तर मला किती वेळ मिळेल?

उत्तर : काळजी करू नका, शासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या वाट्याची (दोन लाखांवरील) रक्कम बँकेत जमा करण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंतची मोठी मुदत दिली आहे.

६. मी माझे पीक कर्ज वेळेवर आणि नियमित भरले आहे, मला काय फायदा मिळेल?

उत्तर : शासनाने प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाईल.

७. प्रोत्साहनपर लाभासाठी कोणत्या वर्षाची कर्जफेड पाहिली जाईल?

उत्तर : सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत तुम्ही पीक कर्ज घेऊन ते ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार वेळेत पूर्ण भरले असेल, तर तुम्ही ५० हजारांच्या लाभासाठी पात्र ठराल. (मात्र तुम्हाला २०२५-२६ आणि २०२६-२७ ची कर्जेही वेळेत भरावी लागतील).

८. मी नियमित कर्ज भरले आहे, पण माझे कर्ज ५० हजार रुपयांपेक्षा कमी होते, तर मला किती रक्कम मिळेल?

उत्तर : तुमचे कर्ज ५० हजारांपेक्षा कमी असल्यास, तुम्ही जेवढी मुद्दल व व्याजाची रक्कम बँकेत भरली आहे तेवढीच रक्कम किंवा किमान ५,००० रुपये तुम्हाला प्रोत्साहन म्हणून मिळतील.

९. मला २०१९ च्या (महात्मा जोतीराव फुले) कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाला होता, आता मला काही लाभ मिळेल का?

उत्तर : होय, जर तुमच्यावर नव्याने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ मधील कर्जाची ५० हजार रुपयांपर्यंतची थकबाकी (३० सप्टेंबर २०२५ अखेर) असेल तर ती पूर्ण माफ होईल. जर ही थकबाकी ५० हजारांहून जास्त असेल, तर ५० हजारांच्या वरची रक्कम तुम्ही भरल्यावर शासन तुम्हाला एकवेळ समझोता (OTS) अंतर्गत लाभ देईल आणि यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत असेल.

१०. दुष्काळामुळे माझ्या पीक कर्जाचे 'मध्यम मुदतीच्या कर्जात' पुनर्गठन झाले आहे, त्याला माफी मिळेल का?

उत्तर : होय, तुमच्या पुनर्गठीत आणि फेरपुनर्गठीत कर्जाच्या थकीत हप्त्यांना सुद्धा या योजनेत २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळेल.

११. कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी किती एकर जमीन असावी अशी काही अट आहे का?

उत्तर : अजिबात नाही. या योजनेत जमीन धारणेचे क्षेत्र कितीही असले तरी (कोणतीही अट न ठेवता) शेतकऱ्यांना लाभ दिला जाणार आहे.

१२. कर्जमाफी मिळवण्यासाठी मला कुठे अर्ज करावा लागेल का?

उत्तर : नाही, तुम्हाला कुठेही लेखी अर्ज करायची गरज नाही. ही योजना पूर्णपणे ऑनलाईन आणि पारदर्शक आहे. बँका स्वतः तुमची माहिती शासनाच्या पोर्टलवर देतील.

१३. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाची कागदपत्रांची अट कोणती आहे?

उत्तर : आधार प्रमाणीकरण करणे आणि 'ॲग्रीस्टॅक' (Agristack) या सरकारी प्रणालीवर तुमची नोंदणी असणे अनिवार्य आहे.

१४. जर माझी ॲग्रीस्टॅकमध्ये (Agristack) नोंदणी नसेल तर माझे कर्ज माफ होणार नाही का?

उत्तर : असे होणार नाही. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. प्रथम तुमची नोंदणी करून घेतली जाईल आणि मगच लाभ दिला जाईल, यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

१५. कोणत्या बँकांकडून घेतलेले कर्ज या योजनेत माफ होईल?

उत्तर : राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि गावाकडच्या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (सोसायट्या) यांच्याकडून घेतलेले कर्ज माफ होईल.

१६. मी आधी नियमित कर्ज भरले आणि आता थकीत सुद्धा आहे, मला कर्जमाफी आणि प्रोत्साहन असे दोन्ही लाभ मिळतील का?

उत्तर: नाही, नियमानुसार ज्या शेतकऱ्याला कर्जमुक्तीचा (२ लाखांपर्यंतचा) लाभ मिळेल, त्याला ५० हजारांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार नाही (वैयक्तिक शेतकरी हा निकष आहे).

१७. या योजनेतून कोणाला वगळण्यात आले आहे? (कोण अपात्र आहे?)

उत्तर : आजी-माजी मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिकेचे सदस्य. तसेच २५ हजारांपेक्षा जास्त पगार किंवा पेन्शन घेणारे सरकारी व निमसरकारी कर्मचारी आणि शेतीव्यतिरिक्त उत्पन्नावर इन्कम टॅक्स (आयकर) भरणारे लोक या योजनेस अपात्र आहेत.

१८. मी सहकारी साखर कारखान्यात हंगामी कामगार म्हणून काम करतो, मला या योजनेचा लाभ मिळेल का?

उत्तर : होय, नक्की मिळेल. साखर कारखान्याचे संचालक/अधिकारी अपात्र असले तरी, 'हंगामी कामगारांना' या अपात्रतेतून वगळण्यात आले आहे, त्यामुळे तुम्हाला लाभ मिळेल.

१९. माझे नाव पात्र शेतकऱ्यांच्या यादीत आहे की नाही, हे मला कुठे पाहायला मिळेल?

उत्तर : शासनाकडून पात्र लाभार्थ्यांना एक विशेष युनिक क्रमांक दिला जाईल. ही यादी तुमच्या ग्रामपंचायत कार्यालयात, तलाठी कार्यालयात तसेच शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर प्रसिद्ध केली जाईल.

२०. कर्जमाफीचे किंवा प्रोत्साहनपर लाभाचे पैसे माझ्या हातात मिळतील की खात्यात येतील?

उत्तर : पैशांचे वाटप थेट तुमच्या संबंधित बँक कर्जखात्यात (DBT द्वारे) शासनाकडून जमा केले जाईल. जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पैसे जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे जेणेकरून तुम्हाला नवीन पीक कर्ज काढता येईल.

२१. या योजनेचा फायदा राज्यातील किती शेतकऱ्यांना होणार आहे आणि यासाठी शासनाने किती निधी दिला आहे?

उत्तर : या योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकरी बांधवांना मिळणार आहे. शेतकऱ्यांची कर्जाच्या ओझ्यातून मुक्तता करण्यासाठी शासनाने तब्बल ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे.

२२. वारंवार कर्जमाफीची वेळ येऊ नये आणि शेतकरी कायमचा कर्जमुक्त व्हावा यासाठी सरकारचा काही वेगळा विचार आहे का?

उत्तर : होय, शेतकरी पुन्हा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकू नये आणि त्याच्या उत्पन्नात कायमस्वरूपी स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी शासनाने एक समिती नेमली होती. या समितीने सुचवलेल्या दीर्घकालीन उपाययोजनांची शासनाकडून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाणार आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, सांगली**



## बदलते तंत्रज्ञान

### आयआरसीटीसीची नवीन वेबसाईट, रेल्वे तिकीट बुकिंग आणखी सोपे!

भारतीय रेल्वेने प्रवाशांचा प्रवास अधिक सुकर आणि डिजिटल अनुभव अधिक सोपा करण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशनने (IRCTC) आपल्या तिकीट बुकिंग पोर्टलची नवीन 'बीटा' (Beta) आवृत्ती अधिकृतपणे लाँच केली आहे. प्रवाशांना अत्यंत वेगाने, सोप्या पद्धतीने आणि कोणत्याही अडचणीशिवाय तिकीट बुक करता यावं, याच उद्देशाने या नवीन वेबसाईटची रचना करण्यात आली आहे.




आयआरसीटीसीच्या या नवीन अपडेटेड वेबसाईटचा अनुभव घेण्यासाठी तुम्ही थेट https://www.irctc.co.in/eticket/ या लिंकला भेट देऊ शकता. याशिवाय, आयआरसीटीसीच्या सध्याच्या जुन्या वेबसाईटच्या होमपेजवर जाऊन 'NEW' या पर्यायावर क्लिक करूनही तुम्ही या नवीन पोर्टलवर पोहोचू शकता.

१. लॉग-इन करा : सर्वप्रथम नवीन आयआरसीटीसी वेबसाईटला तुम्ही भेट द्या. त्यानंतर होमपेजच्या उजव्या कोपऱ्यात वरच्या बाजूला असलेल्या 'Login' या बटणावर क्लिक करा. आता तुमचा युझरनेम आणि पासवर्ड टाकून अकाऊंट लॉग-इन करा.

२. प्रवासाची माहिती भरा आणि रेल्वे शोधा : लॉग-इन झाल्यानंतर, तुम्हाला कुठून कुठे प्रवास करायचा आहे, ते स्थानक निवडा. 'From' मध्ये प्रवासाचे सुरुवातीचे स्टेशन आणि 'To' मध्ये अंतिम स्थानक टाका. त्यानंतर प्रवासाची तारीख, कोटा (Quota) आणि लागू असल्यास सवलत (Concession) निवडून 'Search Trains'वर क्लिक करा.

३. ट्रेन आणि सीट निवडा : आता तुमच्या स्क्रीनवर त्या मार्गावरील सर्व उपलब्ध ट्रेनची यादी दिसेल. यामध्ये ट्रेन सुटण्याची वेळ, पोहोचण्याची वेळ, प्रवासाचा एकूण वेळ आणि सीटची उपलब्धता (Seat Availability) स्पष्टपणे पाहता येईल. तुमच्या आवडीची ट्रेन आणि प्रवासाचा क्लास (उदा. ३AC, Sleeper) निवडून 'Check Availability' वर क्लिक करा आणि त्यानंतर 'Book' वर क्लिक करा.

४. प्रवाशांची माहिती भरा : पुढील पानावर जाण्यासाठी 'Continue Booking' वर क्लिक करा. येथे एक नवीन पेज उघडेल, जिथे तुम्हाला प्रवाशांचे नाव, वय, लिंग (Gender) आणि इतर आवश्यक माहिती अचूक भरावी लागेल.

# भारतीय क्रांतिकारक बटुकेश्वर दत्त



## निमित्त

बटुकेश्वर दत्त एक भारतीय क्रांतिकारी होते. त्यांनी ८ एप्रिल, इ.स. १९२९ रोजी नवी दिल्लीमधील केंद्रीय विधिमंडळात भगत सिंग यांच्याबरोबर बॉम्बस्फोट घडवून आणले होते. यासाठी त्यांना आजन्म कारावासाची शिक्षा झाली. शिक्षेदरम्यान त्यांनी व भगतसिंग यांनी भारतीय राजकारणाच्या कैद्यांवरील अपमानास्पद वागणुकीविरोधात निषेध करणारे ऐतिहासिक उपोषण केले आणि अखेरीस त्यांच्यासाठी काही हक्क मिळवले. कानपूरच्या पी.पी.एन. महाविद्यालयात शिकत असताना त्यांची ओळख भगतसिंहांशी झाली व त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते 'हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या क्रांतिकारी संघटनेत कार्य करू लागले. याच दरम्यान त्यांनी बॉम्ब बनवण्याचे तंत्र शिकून घेतले व त्यांच्या पुढाकाराने आग्रा येथे एक गुप्त बॉम्ब बनवण्याचा कारखाना चालू केला होता.

दत्तांना बी.के. दत्त, बट्टू आणि मोहन या नावानेही ओळखले जायचे. त्यांचा जन्म १८ नोव्हेंबर १९१० रोजी बंगालमधील पूर्व बर्दमान जिल्ह्यातील ओरी या गावातील गोठा बिहारी दत्त यांचे घरी झाला. त्यांनी कॉवनपूरमधील पी.पी. एन हायस्कूलमधून पदवी प्राप्त केली.

भगतसिंगसारख्या क्रांतिकारकांचा उदय रोखण्याच्या हेतूने ब्रिटिश सरकारने भारतीय संरक्षण कायदा १९१५ (the Defence of India Act १९१५) लागू केला, ज्याने पोलिसांना अनेक अधिकार दिले. फ्रेंच अराजकतावाद्यांनी केलेल्या फ्रान्सच्या चेंबर ऑफ डेप्युटीजच्या घटनेपासून प्रेरणा घेऊन भगतसिंघांनी केंद्रीय विधानसभेत बॉम्ब स्फोट करण्यासाठी योजना आखली. सुरुवातीला असे ठरविण्यात आले की बटुकेश्वर दत्त आणि सुखदेव हे बॉम्ब लावतील आणि सिंग युएसएसआरच्या दिशेने प्रवास करतील. तथापि, नंतर योजना बदलली आणि दत्तला सिंह यांच्यासमवेत बॉम्ब लावण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. ८ एप्रिल १९२९ रोजी सिंग आणि दत्त यांनी दर्शदीर्घतेतून धाव घेत विधानसभा परिसरात दोन बॉम्ब फेकले. बॉम्बच्या धुराने हॉल भरले आणि त्यांनी "इन्कलाब जिंदाबाद"च्या घोषवाक्यांचा जयघोष करीत कायद्याचा निषेध करणारी पत्रके फेकायला सुरुवात केली. दरम्यान, या पत्रकानुसार असा दावा केला जातो की केंद्रीय विधानसभेत ठेवण्यात आलेला हा कायदा व्यापार विवादांचा आणि सार्वजनिक सुरक्षा विधेयकाला विरोध करीत आहे आणि त्यात लाला लाजपत राय यांच्या मृत्यूच्या निषेध नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, स्फोटात काही लोक जखमी झाले, पण कुणाचाही मृत्यू झाला नाही. सिंग व दत्तानी हे जाहीर केले कि हे कृत्य नियोजित होते व स्वतःला त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केले.

शालेय इतिहासाच्या पुस्तकात अवघ्या अडीच पानात संपलेल्या सशस्त्र क्रांतीच्या पाठात 'बटुकेश्वर दत्त आणि भगतसिंह यांनी दिल्लीत केंद्रीय संसदेत बॉम्बस्फोट घडवून आणला, त्याबद्दल त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली, असा उल्लेख आढळतो. त्यावेळी दोन मार्क मिळावेत म्हणून इतिहासाची ही ओळ तोंडपाठ केलेल्या आम्हाला बटुकेश्वर दत्त आणि संसदेतला बॉम्बस्फोट एवढीच काय ती ओळख. अशा या महान क्रांतिकारकाचे २० जुलै १९६५ मध्ये निधन झाले.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यातही वाढतोय डिहायड्रेशनचा धोका!

उन्हाळ्यात जशी शरीरातील निर्जलीकरणाची समस्या निर्माण होते तशीच समस्या पावसाळ्यातही निर्माण हेऊन आरोग्याचे काही प्रश्न निर्माण होऊ शकतात हे लक्षात घेऊन पावसाळ्यातही पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे.



पावसाळ्यात केवळ अतिसार, बद्धकोष्ठताच नाही तर डिहायड्रेशन हीदेखील एक सामान्य घटना आहे. जेव्हा तुमचे शरीर जेवढ्या द्रवपदार्थाचे सेवन करते त्यापेक्षा जास्त द्रवपदार्थ गमावते तेव्हा डिहायड्रेशनची समस्या होते. याचा तुमच्या अवयवांच्या कार्यावर परिणाम होतो आणि मूत्रपिंडांवर ताण येणे, थकवा जाणवणे, चक्कर येणे, उष्माघात आणि वेळीच उपचार न केल्यास रुग्णालयात दाखल होणे यासारख्या गंभीर गुंतागुंत होऊ शकतात. कमी तापमानामुळे पावसाळ्यात लोकांना तहान कमी लागते, पण याचा अर्थ असा नाही की त्यांच्या शरीराला गरज नाही.

पावसाळ्यात गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शन खूप सामान्य असतात आणि त्यामुळे अतिसार आणि उलट्या होऊन द्रव आणि इलेक्ट्रोलाइट जलदरित्या कमी होतात, ज्यामुळे डिहायड्रेशनचा धोका वाढतो. कामाच्या वेळी किंवा प्रवासादरम्यान पुरेसे पाणी न प्यायल्याने व जास्त घाम आल्यानेदेखील डिहायड्रेशनची समस्या सतावत असल्याचे मुंबईतील झायनोव्हा रूग्णालयातील इंटरनल मेडिसिनचे डॉ. निमित नागदा यांनी सांगितले.

बाह्य रुग्ण विभागात उपचाराकरिता येणाऱ्या २५ ते ५५ वयोगटातील १०पैकी ७ व्यक्तींमध्ये तोंड आणि ओठ कोरडे पडणे, थकवा आणि अशक्तपणा जाणवणे, गडद पिवळ्या रंगाची लघवी किंवा लघवी कमी होणे, चक्कर येणे किंवा डोकेदुखी आणि स्नायूंमधील वेदना अशा तक्रारी आढळून आल्याचे शीव रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ मोहन जोशी यांनी सांगितले.ते म्हणाले डिहायड्रेशनच्या उपचारांमध्ये शरीरातील पाण्याची पातळी प्रमाणात राहील याकरिता ओआरसचे सेवन करणे आणि गंभीर प्रकरणांमध्ये आयव्ही फ्लुइड्सद्वारे उपचारांचा केले जातात. प्रत्येकाने डिहायड्रेशनची समस्या टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याची आणि हायड्रेटेड राहण्याची खात्री करा.

# १७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आशेचा किरण

## मंत्री आदिती तटकरे यांची माणगाव-इंदापूर बायपासला भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

"यंदा तरी गणपती बाप्पांचे आगमन खड्डेमुक्त रस्त्याने होईल का?" हा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रत्येक कोकणवासीयाच्या मनात घर करून बसला होता. असंख्य आश्वासने, वारंवार बदललेल्या मुदती, अपूर्ण कामे आणि हजारो नागरिकांच्या संयमाची कठोर परीक्षा घेतलेल्या माणगाव-इंदापूर बायपासला अखेर पुन्हा एकदा आशेची नवी पालवी फुटली आहे.



राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी शनिवार, दि. १८ जुलै रोजी दुपारी माणगाव-इंदापूर बायपास महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी येत्या गणेशोत्सवापूर्वी किमान एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल, असे ठाम आश्वासन दिले. पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी संबंधित यंत्रणांना कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना दिल्याचे सांगितले.

माणगाव बायपास हा केवळ एक रस्ता नाही; तर हजारो कुटुंबांच्या सुरक्षित प्रवासाशी, कोकणच्या अर्थकारणाशी आणि लाखो गणेशभक्तांच्या भावनांशी जोडलेला जीवनमार्ग आहे. गेल्या १७ वर्षांत या महामार्गाने अनेक अपघात, वाहतूक कोंडी, धुळीचे लोट, खड्ड्यांचा त्रास आणि नागरिकांचा संताप अनुभवला आहे.

यावेळी मंत्री तटकरे यांनी 'लाडकी बहीण' योजनेबाबतही स्पष्ट भूमिका मांडली. ही योजना कोणत्याही परिस्थितीत सुरूच राहणार असून पात्र महिलांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी त्यांनी ग्वाही दिली. ज्या महिलांनी वेळेत केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांना लाभ निश्चित मिळेल. विरोधकांनी केलेल्या टीका आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरही शासनाने आवश्यक सुधारणा करून योजना अधिक सक्षमपणे सुरू ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगडच्या विकासाविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, जिल्ह्याला दोन मंत्री आणि खासदार सुनील तटकरे यांचे नेतृत्व लाभले आहे. या सर्वांच्या समन्वयातून विकासकामांना अधिक गती देण्याचा प्रयत्न सुरू असून राजकीय मतभेदांपेक्षा जनतेच्या हिताला प्राधान्य दिले जात आहे. पालकमंत्री कोणताही असो, त्याला माझ्या शुभेच्छाच असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.माणगाव शहरातील वाहतूक कोंडी कायमची कमी करण्यासाठी मोर्बा रोड ते राष्ट्रीय महामार्ग जोडणाऱ्या सर्व्हिस रोडसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. बायपास आणि हा अंतर्गत सेवा मार्ग पूर्ण झाल्यानंतर शहरातील अवजड वाहतूक बाहेरून वळवता येईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आजही कोकणात गणेशोत्सव म्हणजे भावनांचा महासागर. लाखो चाकरमानी आपल्या गावाकडे परतण्यासाठी दिवस मोजत असतात. प्रत्येक आई-वडील आपल्या लेकरांच्या सुरक्षित आगमनाची वाट पाहत असतात. प्रत्येक घरात गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू असते. अशा वेळी प्रवास सुरक्षितअसणे ही प्रत्येक कुटुंबाची अपेक्षा आहे.

# मूलभूत सुविधांसाठी खासदार बारणे यांना निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ऊंबरणेवाडी, खोंडावाडी येथील ग्रामस्थांनी आपल्या मूलभूत समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना निवेदन सादर करीत आपल्या व्यथा मांडल्या. रस्ता, पिण्याचे पाणी, वीज आणि शिक्षणाच्या सुविधांपासून वाडी आजही वंचित असल्याने नागरिकांनी सुविधांची मागणी केली.



डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या या वाड्यांतील नागरिकांना मूलभूत सुविधांची गरज आहे. वाडीपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता नसल्याने पावसाळ्यात नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे.या परिसरात वीज नसल्यामुळे रात्रीच्या वेळी अंधाराचे साम्राज्य असून साप व इतर सरपटणाऱ्या प्राण्यांची भीती कायम असते.

ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची परिस्थितीही असून जवळच मोरबे धरण असूनही ग्रामस्थांना नदीपात्रात खड्डे खोदून मिळणारे पाणी पिण्यासाठी वापरावे लागत आहे. तसेच योग्य रस्ता व वाहतुकीच्या सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत असल्याचे प्रदीप उघडा, बबन वीर, अनंता पारधी, ललित उघडा, मंगल पोकला, वामन पिरकड, अनंता पारधी, राजू उघडा यांनी आपल्या निवेदनात नमूद करीत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

MEDICOVER HOSPITALS
NAVI MUMBAI

Specialist Consultation @ Karjat

Dr. Amit Prakash Nagarik
MD (MED), DNB (Nephrology)
Senior Consultant Nephrologist
Every Month
2nd Thursday
Time: 11:00am - 12:00pm

Dr. Nikhil Bharambe
MBBS, D' (Ortho), MCh (Ortho) PGDMLS
Consultant Orthopedic Surgeon
Every Month
1st & 3rd Thursday
Time: 11:00am - 12:00pm

Dr. Anup Mahajani
MBBS, MD (Medicine), DNB (Cardiology), DCCM ( JHU - USA), Diploma in Medico - Legal Cases
Consultant Interventional Cardiologist
Every Month
1st Thursday
Time: 11:00am - 12:00pm

Dr. Dipak Ahire
MBBS, MD (Medicine), DNB (Gastroenterology), Fellowship In Advanced Endoscopy
Consultant Gastroenterologist, Hepatologist & Endoscopist
Every Month
1st Thursday
Time: 11:00am - 12:00pm

Dr. Arvind J Vatkar
MBBS, MS (Orthopaedics), AFIH, MCh (Spine, UK) Advanced Spine Fellowships (Nottingham UK, Edge Hill University UK, Stockport UK)
Consultant Orthopaedics & Spine Surgery
Every Month
2nd Tuesday
Time: 11:00am - 12:00pm

Dr. Piyush Singhania
MBBS, MS, MCh
Consultant Urologist
Every Month
4th Tuesday
Time: 11:00am - 12:00pm

Venue: Ratnraj Clinic, Karjat / Matoshree Hospital, Karjat
RSVP: RSVP - Raj Mhatre 86556 17835 | 040 6833 4455

# कोमसाप, ज्येष्ठ नागरिक संघाच्या संयुक्त विद्यमाने कालिदास दिन उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात कालिदास दिन साजरा झाला. समारंभाचे अध्यक्ष होते रवींद्र घोडके व प्रमुख वक्त्या होत्या प्राध्यापिका प्रिया नेर्लेकर मॅडम. कोमसाप खोपोली अध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये, सेक्रेटरी नरेंद्र हर्डीकर, खजिनदार प्रा. सुरेश चव्हाण व प्रमुख वक्त्या व समारंभाध्यक्ष यांचे हस्ते गणेश पूजन संपन्न झाले. तसेच मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. निशा दळवी व शर्वरी घुमरे यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले.



कोमसाप खोपोली अध्यक्षांच्या हस्ते समारंभाध्यक्ष तसेच वया श्रीमती नेर्लेकर मॅडम यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच मान्यवरांना गुलाब पुष्प देउन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात राजोपाध्ये यांनी कालिदास दिनाचे महत्त्व विशद करत त्याच्या अद्भूत, अलौकिक प्रतभेची महती सांगून सद्य परिस्थितीत त्याच्या साहित्यकृतीतून काय शिकायला हवे याचे विवेचन केले.

कविसंमेलनात गझलकार डॉ.सुभाष कटकदौंड, सताणे सर, निशा दळवी, शर्वरी घुमरे, जयश्री पोळ, शितल अहिर यांनी कविता सादर केल्या. प्रमुख वक्त्या नेर्लेकर मॅडम यांनी मेघदूत खंडकाव्यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले. यक्ष विरहाचे वर्णन करताना त्याने आषाढातील पहिल्या दिवशी दिसलेल्या काळ्या मेघास दूत बनविले व दूर असणाऱ्या यक्षिणीला भेटून संदेश पोहचविण्याचे काम दिले.

## बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी शासनाचा मदतीचा हात


**माणगाव : प्रतिनिधी**

वाढती बेरोजगारी, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि आर्थिक अडचणींमुळे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न अनेक युवक-युवतींचे अपूर्ण राहते. अशा परिस्थितीत शासनाने स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत विविध व्यवसायांसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याची योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली असून, इच्छुकांनी ३० जुलैपूर्वी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या योजनेत संगणक, झेरॉक्स मशीन, वेल्डिंग मशीन, पिको फॉल मशीन यांसारख्या व्यवसायाभिमुख साधनांचा समावेश असून, या उपकरणांच्या सहाय्याने युवकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्याची आणि स्वावलंबी होण्याची संधी मिळणार आहे.

# पेण येथील सामाजिक कार्यकर्ते मनोज गावंड डॉक्टरेट पदवीने सन्मानीत

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील सामाजिक कार्यकर्ते महाराष्ट्र सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष मनोज गावंड यांच्या ३० वर्षांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानीत करण्यात आले. साउथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटी देशभरात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून सन्मानित करते.



मनोज गावंड यांनी १९९८ मध्ये महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था स्थापन केली या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा, पाणलोट विकास, एचआव्ही निर्मूलन, ग्राम समृद्धी ग्रामीण विकास, मानवी हक्क रक्षण यासह अनेक प्रकल्प राबविले तसेच महीलांचे हक्क, एड्स जनजागृती या सारखे उपक्रमे राबवली आहेत.

मानवी हक्क या विषयातील भरीव योगदानाची दखल घेऊन साउथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीने त्यांना मानद डॉक्टरेट पदवी चेन्नई येथे आयोजित विशेष समारंभात ग्लोबल एज्युकेशन मिशनचे डॉ. आर. सेल्वम यांच्या अध्यक्षतेखाली, तामिळनाडू क्रीडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. ए.एम. मूर्ती यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित केले.

या कायर्क्रमाला माजी न्यायमूर्ती डॉ. व्ही.के. व्यंकटेशन, आंध्रप्रदेशचे माजी न्यायमूर्ती जे. हरिदास, प्रसिद्ध दाक्षिणात्य चित्रपट निर्माते व अभिनेते मनघई हरिराजन हे मान्यवर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यापूर्वी गावंड यांना जिल्हाधिकारी यांनी व एड्स नियंत्रण सोसायटीने तसेच विविध सामाजिक संघटनांनी विविध पुरस्कार देऊन गौरव केला आहे. मनोज गावंड यांना मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आल्याने गावंड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पेण शहरासह जिल्ह्यातील पत्रकारांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच माहीती व जनसंपर्क नागपूर विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी गावंड यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही नमूद विक्रेते यांच्या मालकी व वहिवाटीतील मिळकत असून सदरची जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायदेशीररित्या खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेणेकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे....

**मिळकतीचे वर्णन मौजे - वारदोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र./ उपविभाग क्र | भुधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. | कबजेदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३९/३/अ | भोगवटादार -१ | ०.२५.०० पो.ख. ०.१२.०० एकूण क्षेत्र ०.३७.०० | ३.१४ | कानू लडकू कथारा |

सदर नमूद मिळकतीमध्ये अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारे करार, ताबा, गहाण, दान, बक्षीस, एजंट, तारण, भाडेपट्टा, पोटगी, सोडचिठ्ठी, अधिकारपत्र, परा किंवा तत्सम कोणतेही हक्क, मालकी व अन्य हितसंबंध असल्यास सदर बाबी संबंधीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे सबळ पुरावे समक्ष कार्यालयाचे पत्त्यावर खालील सही करणारे यांचे पनवेल येथे भेटून अथवा वेळ देऊन भेटावे. तसेच विहीत मुदतीत कोणाकडून काही हरकत, तक्रार, दावा वा आक्षेप सदर मिळकती संदर्भात असल्यास कोणत्याही प्रकारे दावा, हक्क हितसंबंध असल्यास समजून आमचे अशिल सदर मिळकती हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेले तक्रारी, दावे, हरकती या बाबतदाराने उठविले व त्या जाणूनबुजून सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून जगाते यांनी तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०७/२०२६

सही/-
ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण
एल. एल. बी.
ॲडव्होकेट हायकोर्ट

कार्यालयीन पत्ता : ११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक, द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७, खारघर - ४१०२१० मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा
शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय
पता: नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र - ४००७०४
PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D KARANJA
An Autonomous Body under Ministry of Education Govt.of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran Raigad, Maharashtra - 400704

| दूरभाष/Tele: 022 -27222132 | ईमेल/E-Mail :kvkaranja@gmail.com | KV CODE: 1205 |
|---|---|---|
| CBSE Affiliation No. 1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE: 27241501112 |

वैबसाइट - **https://nadkaranja.kvs.ac.in** ईमेल: **kvkaranja@gmail.com**

साक्षात्कार सूचना / Walk-In Interview
**Urgent Requirement**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष **2026-27** हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता | साक्षात्कार दिवस |
|---|---|---|
| स्नातकोत्तर शिक्षक (Post Graduate Teachers) (भौतिक विज्ञान (Physics), अर्थशास्त्र (Economics) भूगोल Geography) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में 50% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी/ एम.कॉम) एवं बी.एड डिग्री | **27.07.2026 (सोमवार)** |
| **प्रशिक्षक:** खेल प्रशिक्षक, विशेष शिक्षक Sports Coach, Special Educator. | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा | |

**पंजीकरण समय : 8:00 AM TO 10:00 AM**
नोट: अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें । आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ आधार कार्ड (Original),तीन पासपोर्टआकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**Application form QR Code**

सही/-
प्राचार्य/Principal
पीएम श्री केन्द्रीय विद्यालय / PM SHRI Kendriya Vidyalay.
एन.ए.डी. करंजा/N.A.D. Karanja
उरण जिला-रायगढ़ (महाराष्ट्र) / Uran Dist-Raigad (MH)

# मुख्यमंत्री फडणवीस महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेणारे नेतृत्व -संदीप नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेणारे नेतृत्व असून महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी ईश्वर त्यांना शक्ती प्रदान करो, अशा शुभेच्छा माजी आमदार संदीप नाईक यांनी दिल्या.मुख्यमंत्री फडणवीस यांचा २२ जुलै रोजी वाढदिवस आहे. मात्र वाढदिवसाचे उत्सव साजरे न करता लोकसेवा करावी, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे. त्यांच्या आवाहनानुसार सानपाडा नगरीमध्ये संदीपजी नाईक प्रतिष्ठानच्या वतीने आणि सानपाडा भारतीय जनता पक्ष यांच्या सहकार्याने विविध लोकोपयोगी उपक्रमांचा समावेश असलेला सेवा सप्ताह सुरू करण्यात आला आहे.



या सेवा सप्ताहाचा शुभारंभ माजी आमदार संदीप नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाला. भव्य रक्तदान शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, वृक्षारोपण, स्वच्छता कर्मींचा सन्मान, छत्री वाटप अशा विविध जनसेवेच्या उपक्रमांचा शुभारंभ संदीप नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर दशरथ भगत, नगरसेवक भाऊ भापकर, नगरसेवक सुनील कुरकुटे, नगरसेविका शिल्पा ठाकूर, नगरसेविकास शैला पाटील, नगरसेवक निशांत भगत, परिवहन समितीचे सदस्य राजेश राय, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, समाजसेवक जगदीश पाटील, समाजसेवक राजेश ठाकूर, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्याचा गौरव करताना संदीप नाईक यांनी देवा भाऊंचे नेतृत्व सर्व समावेशक, सर्व समाज घटकांना न्याय देणारे आणि महाराष्ट्राला विकासाच्या उंचीवर नेणारे असल्याचे नमूद केले. वाढदिवसाच्या निमित्त उत्सव साजरे न करता त्याकरता येणारा खर्च मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये द्यावा. विधायक कार्यक्रम हाती घ्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री महोदयांनी केले आहे.

त्यांच्या आवाहनानुसार नवी मुंबईत सेवा सप्ताह सुरू झाला आहे. नगरसेवक सुनील कुरकुटे,नगरसेवक भाऊ भापकर, नगरसेविका शैला पाटील, नगरसेविका शिल्पा ठाकूर यांनी सांगितले की, युवा नेतृत्व संदीप नाईक यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सानपाडा येथे सेवा सप्ताह राबविण्यात येत असून त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो आहे.

# भंगार व्यावसायिकाकडे खंडणी प्रकरणात महिलेला अटक

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इंदिरानगर परिसरात भंगार व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाकडे दोन लाख रुपयांची खंडणी मागून त्याला बेदम मारहाण केल्याप्रकरणी पूजा सुरेश बनसोडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना सोमवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून या गुन्ह्यातील अन्य चार आरोपी अद्याप फरार आहेत.




या प्रकरणी तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात विविध कलम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार सिंह उर्फ ठाकूर (वय ३२) हे

## चार आरोपी फरार

इंदिरानगर परिसरात स्क्रॅपचा व्यवसाय करतात. २४ जुलै रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या स्क्रॅप दुकानासमोर आरोपींनी एकत्र येत दोन लाख रुपयांची खंडणी मागितली. तक्रारदाराने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांच्यासह दुकानात काम करणाऱ्या उमेश गोड (वय ३३) यांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत दोघेही जखमी झाले असून त्यांना गंभीर दुखापत झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

या गुन्ह्यात पूजा बनसोडे, रमजान इमाम शेख, सरिता सरवदे उर्फ सोनी, नरेंद्र सावकार आणि हुसेन शेख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी पूजा बनसोडे यांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना सोमवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

उर्वरित चार आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणात एकूण पाच आरोपी आहेत. त्यामध्ये दोन महिला व तीन पुरुष आरोपींचा समावेश आहे. अशी माहिती तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांनी दिली आहे.

# उरणमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती व कारवाईसाठी सहकार्याची ग्वाही

**उरण : बातमीदार**

आज नशामुक्त नवी मुंबई अभियान उरण मध्ये लीड करणारे दर्शन नाईक व प्रतिक अमृते यांनी नवी मुंबई न्हावा शेवा बंदर पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) विजय चौधरी यांची सदिच्छा भेट घेतली व उरणचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्वागत केले.

या भेटीदरम्यान उरण परिसरातील अमली पदार्थांचे व्यसन, ड्रग पेडलिंग तसेच युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाच्या समस्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अमली पदार्थांच्या विक्री व वितरणाविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी पोलीस प्रशासन व सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

शाळा, महाविद्यालये तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये संयुक्तपणे अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम व मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमांसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन एसीपी विजय चौधरी यांनी दिले.सामाजिक



सहभाग, जनजागृती आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून परिसर अमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने ही भेट महत्त्वपूर्ण असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पाणजे पाणथळ कायदेशीर संरक्षणाच्या एक पाऊल जवळ; पर्यावरण संघटनांसाठी दिलासा

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई बंदरापलीकडील उरणमधील वादग्रस्त २८९ हेक्टर क्षेत्रफळाच्या पाणजे–डोंगरी पाणथळ क्षेत्राला अखेर कायदेशीर संरक्षण मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. रायगड जिल्हा प्रशासनाने दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (ग्राउंड ट्रुथिंग) अहवाल सादर करून या क्षेत्राचा पाणथळ म्हणून दर्जा मान्य केल्याची माहिती पर्यावरणवाद्यांनी दिली.महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या भरती–ओहोटीवर अवलंबून असलेल्या (इंटरटायडल) पाणथळ क्षेत्राच्या संरक्षणासाठी अनेक वर्षे लढा देणाऱ्या पर्यावरण संघटनांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.



नॅटकनेक्ट फाउंडेशनच्या माहितीनुसार, २००६–०७ मधील उपग्रह छायाचित्रांवर आधारित नॅशनल वेटलँड इन्व्हेंटरी अँड असेसमेंट अंतर्गत महाराष्ट्रातील सुमारे २३ हजार पाणथळांची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर चेन्नईस्थित नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंटने या पाणथळांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण केली असून, पर्यावरण संरक्षण कायद्याअंतर्गत अधिसूचना काढण्यासाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे.

राज्य पाणथळ प्राधिकरणातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर नॅटकनेक्टला सांगितले की, रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंटने नोंदविलेल्या १९ पाणथळांपैकी ११ क्षेत्रांना मान्यता दिली असून त्यात पाणजेचाही समावेश आहे. बेलपाडा आणि भेंडखळ पाणथळांचाही अधिसूचनेकडे मार्ग मोकळा झाला आहे. तसेच पनवेल तालुक्यातील खरघर, तळोजा, खरघर सेक्टर–२५, कळंबोली, सिंकर आणि मोरावे ही क्षेत्रेही या यादीत आहेत.

बॉम्बे एन्व्हायर्नमेंटल ॲक्शन ग्रुपचे संस्थापक आणि ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ देबी गोयंका यांनी नकाशांचा अभ्यास करून पाणजे हे पाणथळ क्षेत्र असल्याचे सर्वप्रथम ठोसपणे सिद्ध केले होते. उपग्रहाधारित रंगसंगतीच्या नकाशांचे त्यांनी केलेले बारकाईने विश्लेषण पाणजेच्या संरक्षणाच्या लढ्याला मोठे बळ देणारे ठरले, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

सरकारी अधिकाऱ्यांच्या मते, शेवा, जसखार, मुरुड खाडी आणि मँग्रोव्ह वेटलँड कॉम्प्लेक्स या क्षेत्रांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या सध्याच्या अहवालात समावेश नसल्याने त्यांच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सागर शक्तीचे संचालक नंदकुमार पवार यांनी या निर्णयाचे स्वागत करताना, "ही बातमी आमच्यासाठी कानाला गोड वाटणाऱ्या संगीतासारखी आहे," असे सांगितले.

"पाणजे हे राज्यातील सर्वांत मोठे इंटरटायडल पाणथळ क्षेत्र असून उरणच्या नाजूक पर्यावरणासाठी त्याचे संरक्षण अत्यावश्यक आहे," असे ते म्हणाले.जासई परिसरासह अनेक पाणथळे बुजविल्यामुळे परिसरातील गावांमध्ये पूरस्थिती अधिक गंभीर झाली असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

"पाणजेने चिकाटीचे फळ मिळते हे सिद्ध केले आहे. आता महाराष्ट्रातील २३ हजार नोंदणीकृत पाणथळांना कायदेशीर संरक्षण मिळवून देण्यासाठी लढा सुरू राहील," असे बी. एन. कुमार यांनी सांगितले. याला दुजोरा देत नंदकुमार पवार यांनी अतिक्रमण होण्यापूर्वी सर्व पाणथळांना संरक्षण मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले.पर्यावरणवाद्यांनी खारघरमधील नोंदणीकृत पाणथळांवर सुरू असलेल्या किनारी रस्ता (कोस्टल रोड) प्रकल्पामुळे वाढत असलेल्या धोक्याबाबतही चिंता व्यक्त केली.

# फुंडे विद्यालयात विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकप्रगतीस प्रोत्साहन देण्यासाठी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना सेजल कडू (सोनारी) यांच्या माध्यमातून ७० मोफत गणवेश प्राप्त झाले.

प्रास्ताविकात विद्यालयाचे प्राचार्य बी .बी. साळुंखे यांनी शाळेतील विविध उपक्रमाची माहिती देत दातृत्व करणाऱ्या मान्यवरांना धन्यवाद दिले.

प्रसंगी विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू यांनी दानाचे महत्व सांगीतले. विशेष आभार किशोर कडू यांचे मानले.सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे किशोर कडू साहेब (श्री. सदगुरु कृपा फ्रेट सर्व्हिसेस चे डायरेक्टर), सेजल कडू (सोनारी) विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, गजानन शिर्के, गणेशजी,प्राचार्य बी. बी. साळुंखे,उपमुख्याध्यापिका एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील,वरिष्ट लेखनिक नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर,उपशिक्षक पी.ए. पाटील, उपशिक्षिका एस एस. म्हात्रे, डी.जे. सुतार, एस. जे. माळी उपस्थित होते.

# रायगडमधील साहित्यिकांची आषाढी साहित्य वारी रायगडाचा अभिमान

**उरण : बातमीदार**

रायगडमधील साहित्यिकांची आषाढीला साहित्य वारी निघते हा रायगडाचा अभिमान असे मत ॲड.गोपाळ शेळके यांनी व्यक्त केले.उरण रायगड येथून कोकण मराठी साहित्य परिषद(कोमसाप )साहित्यिकांची पंढरपुरला आषाढी वारी १८ जुलै रोजी उरण तालुक्यातील नवघर येथून निघाली.या वर्षीची ही परिषदेची १६ वी वारी.मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी श्रीफळ वाढवून प्रस्थानास सुरुवात केली. कोमसाप विश्वस्त साहित्यरत्न प्रा. एल बी पाटील यांच्या मार्गदर्शनात ही वारी निघत असते.

शाखेचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, बाल विभाग प्रमुख संजीव पाटील, जिल्हा सचिव संजय होळकर, रामसुनील म्हात्रे,नाटककार किशोर पाटील,कवी नरेश पाटील, महेंद्र गावंड, किशोर म्हात्रे, नाटककार भारत पाटील, संजय पाटील, जान्हवी गंधार,अर्चना विनय,सरिता सुनील ,उज्वला देविदास,या अठ्ठावीस बंधुभगिनीनी विठुरायाच्या गजरात दिडीची सुरुवात केली.

पाहिलं टप्प्यात नढाळ मंदिरात शांताराम देशमुख,गोपाळ शेळके,दत्ताराम शेळके ,आपत्ती निवारण प्रसिद्ध जयपाल पाटील ,निखिल देशमुख,इत्यादींनी वारकऱ्यांचे स्वागत केले. पंढरीत साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन घेण्यात आले .त्या वेळी मच्छिंद्र म्हात्रे,रामचंद्र म्हात्रे, रायगड भूषण किशोर पाटील.नरेश पाटील,संजय होळकर, रमण पंडित,संजय पाटील, किशोर म्हात्रे,महेंद्र गावंड यांनी संजीव पाटील यांच्या सूत्रसंचालनात सुरेख कविसंमेलन संपन्न झाले.

# नवी मुंबई महानगरपालिका पदभरतीसाठी यंत्रणा सज्ज; १८,९३० उमेदवार देणार परीक्षा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सरळसेवा भरती २०२५–२०२६ अंतर्गत गट–अ, गट–ब व गट–क मधील २० संवर्गातील १३२ पदांकरिता एकूण १९,२२० अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती २०२५–२०२६ अंतर्गत गट–अ, गट–ब व गट–क मधील ६ संवर्गाची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन स्पर्धा परीक्षा दि.२१ व २२ जुलै २०२६ या कालावधीत ६ जिल्ह्यांतील १३ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. यामध्ये उमेदवारांना त्यांच्या नजिकच्या केंद्रावर परीक्षा देता यावी अशाप्रकारे नियोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक पध्दतीने काटेकोर रितीने व्हावी याकडे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी कटाक्षाने लक्ष दिले असून परीक्षा सुव्यवस्थितरित्या पार पाडाव्यात याकरिता प्रत्येक जिल्ह्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे वर्ग १ श्रेणीचे अधिकारी हे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक केंद्रावर महानगरपालिकेचे २ अथवा ३ अधिकारी केंद्र निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत.



अमरावती जिल्ह्यात १११२, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २५३५, मुंबई जिल्ह्यात ८१२३, नागपूर जिल्ह्यात ९४८, नाशिक जिल्ह्यात १७८३ व पुणे जिल्ह्यात ४४२९ अशा प्रकारे ६ जिल्ह्यात एकूण १८,९३० उमेदवार परीक्षेस प्रविष्ट झाले आहेत.सदर परीक्षा प्रक्रिया टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्या माध्यमातून घेण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेने सुरूवातीपासूनच परीक्षा प्रणालीतील प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष दिले आहे.

परीक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांना सदर परीक्षेचे प्रवेश पत्र दि.१० जुलै २०२६ पासूनच ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच उमेदवारांना प्रवेशपत्रे लवकरात लवकर डाऊनलोड करावीत, असे संदेश एसएमएस व ई मेलव्दारे पाठविण्यात आलेले आहेत.

प्रवेशपत्रे घेऊन उमेदवारांनी आपल्या परीक्षा स्थळी प्रवेशपत्रात नमूद केलेल्या वेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती २०२५–२०२६ अंतर्गत घ्यावयाच्या ऑनलाईन परीक्षेचे संवर्गनिहाय वेळापत्रक नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

सदर पदभरती परीक्षेस पात्र असलेल्या उमेदवारांनी परीक्षा घेणा–या संस्थेमार्फत त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रवेशपत्रामध्ये व माहिती पुस्तकात नमूद केलेल्या सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे व त्यांचे तंतोतंत पालन करावे आणि परीक्षा केंद्रावर नमूद वेळेवर उपस्थित राहावे, असे महानगरपालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची भरती प्रक्रिया ही अत्यंत काटेकोर व पारदर्शक पध्दतीने होत असून नोकरी मिळवून देण्यासाठी कोणत्याही प्रकारची मागणी करणा–या भूलथापांना व आमिषांना उमेदवारांनी बळी पडू नये आणि याबाबत दक्ष राहून थेट स्थानिक पोलीसांकडे तक्रार करावी, असे सूचित करण्यात येत आहे.

भरतीविषयक अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in तसेच महानगरपालिकेच्या अधिकृत सोशल मिडीया पेजला भेट द्यावी असे आवाहन नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

# विद्याभवनमध्ये राष्ट्रीय विज्ञान कथा दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात मराठी विज्ञान परिषदेचे नवी मुंबई विभाग अध्यक्ष डॉ. किशोर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, १८ जुलै रोजी राष्ट्रीय विज्ञान कथा दिन साजरा करण्यात आला.१९ जुलै हा दिवस ज्येष्ठ भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्मदिवस असल्यामुळे हा दिवस राष्ट्रीय विज्ञान कथा दिन म्हणून साजरा केला जातो.

अलंकृता गणोरकर, कृतिका सावंत, ओमकार शिंदे, स्नेहल शिंदे, जान्हवी डाकवे, पूर्वी गोसावी, वेदिका कणसे, ज्ञानेश्वरी अडसूळ, प्रांजळ शेजवळ, प्रांजळ अभंग, जानकी काळेल, स्वरा माने, श्रेया नरवडे या विद्यार्थ्यांनी



विविध विज्ञान कथा सादर केल्या. उत्कृष्ट कथा सादर करण्यासाठी अलंकृता गणोरकर आणि वेदिका कणसे यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. किशोर कुलकर्णी यांनी वाचन आणि विज्ञान विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधत 'तर मी कोण आहे' या विज्ञानकथेचे सादरीकरण केले. सखोल शास्त्रशुद्ध विचार आणि तत्त्व डोळ्यासमोर ठेवून विज्ञान कथा गुंफल्या जातात. या कथा वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभूती गुंजाळ, दिप्ती म्हात्रे, धनंजय जाधव, अथर्व पवार या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या डॉ. पूनम हुदार, मुख्याध्यापक गोरख कदम तसेच समन्वयक पांडुरंग मुळीक, सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# साहित्य भारतीतर्फे नवी मुंबईमध्ये कालिदास जयंती उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

साहित्य भारतीय नवी मुंबई शाखेच्या वतीने नवी मुंबई विद्यालय सेक्टर एक वाशी या ठिकाणी कवी कुलगुरू कालिदास यांच्या जयंती उत्सवाचा कार्यक्रम संपन्न झाला.

सदर कार्यक्रमासाठी चित्रा पाटकर या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रम प्रसंगी साहित्य परिषदेचे प्रचार प्रसिद्ध प्रमुख संदीप बोडके, भोसले यांची उपस्थिती होती. पाटकर यांनी कवी कुलगुरू कालिदास यांच्या साहित्य विषयी त्याचप्रमाणे त्यांच्या साहित्यातील वैशिष्ट्ये विविध उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करून सांगितली. कवी कालिदास यांचे साहित्य भारतातच नव्हे तर जगभरातील सोळा भाषांमध्ये प्रकाशित भाषांतरित झालेले आहे यावरून त्यांच्या काव्याचे महत्त्व आपल्याला जाणवते.

कवी कालिदास हे कवी नाटककार महाकाव्य लिहिणारा अशा विविध भूमिकांमधून आपल्याला त्यांच्या साहित्यातून भेटतात . कुमारसंभव,शाकुंतल.,रघुवंशम मेघदूत, अनेक प्रकारचे साहित्य कालिदासाने निर्माण केले. कालिदासांनी निर्माण केलेले साहित्य त्यातील उपमा अलंकार त्याचप्रमाणे त्यांनी निर्माण केलेले प्रसंग त्यांची योजना निसर्गातील प्रतिकांचा मानवी पात्रांशी जोडलेला त्यांनी संबंध हे सर्व अतुलनीय आहे.

आजही आपल्याला कालिदासांचे साहित्य हे काल सुसंगत वाटते हेच त्यांच्या साहित्याचे अमरत्व आहे. कवी कालिदासांचे साहित्य जर आपणाला अभ्यासायचे असेल तर त्यासाठी संस्कृत भाषा येणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# जेएसडब्ल्यू फाउंडेशनच्या सौजन्याने उभारलेल्या चोरढे येथील महात्मा गांधी विद्यामंदिर नूतन इमारतीचे उद्घाटन







**रेवदंडा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात समाज मंदिर, विदया मंदिर असा विविध क्षेत्रातील विकास कामासाठी सिएसआर निधीचे योगदान असायला हवे, रायगड जिल्हातील सर्वाधिक उदयोग, इंडस्ट्रिज आहेत परंतू यांच्या सिएसआर निधी कुठे खर्च होतोय हे समजून न येता, सिएसआर निधीचा खर्च फक्त कागदावर दिसतोय असा खोचक टोला आमदार महेंद्र दळवी यांनी जेएसडब्लू फांउडेशनच्या सामाजीक दायित्व विभागाचे सौजन्याने उभारलेल्या चोरढे येथील दिनाभाई मोरे शिक्षण मंडळ सानेगाव संचलित महात्मा गांधी विदया मंदिर नुतन इमारतीचा उद्धाटन सोहळा प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना लगावला.

जेएसडब्लू फांउडेशनच्या सौजन्याने उभारलेल्या चोरढे येथील महात्मा गांधी विदया मंदिर नुतन इमारतीचा उद्धाटन सोहळा शुक्रवार दि. १७ जुलै रोजी सायकांळी नंदकुमार म्हात्रे यांचे अध्यक्षते खाली मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी उद्धाटक म्हणून आमदार महेंद्र दळवी तर प्रमुख पाहूणे दिनाभाई मोरे शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष बाळू लखमा पाटील,जेएसडब्लूचे रिजनल सिएसआर हेड सुधीर तेलंग,जेएसडब्लू ग्रीन स्टिल साळाव प्रशांत ठाकूर, साळाव सिएसआर विभाग प्रमुख गणेश घोडके,सिएसआर अधिकारी डोलवी कुणाल तडस,प्रविण पेणकर, राकेश चवरकर प्रतिभा ठाकूर यांच्यासह जि.प.सदस्य विघ्नेश माळी, जि.प.सदस्या ज्योती नागावकर,तळेखार सरपंच विजय घाणेकर,उद्देश वाडकर, हरिश्चद्र वाजंत्री, माजी सभापती चंद्रकांत मोहिते,बोर्ली सरपंच सपना जायपाटील, वळके सरपंच प्रिया म्हात्रे, मांडळा माजी सरपंच सुचिता पालवणकर, साक्षी गायकवाड,आदी मान्यवर मंडळी तसेच शाळेचे संचालक मंडळ व ग्रामस्थ चोरढे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पांडुरंग भोरबोले जयधर पाटील, तसेच अनिल चोरढेकर यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्धाटक आमदार महेंद्र दळवी यांचे स्वागत चोरढे महात्मा गांधी विदया मंदिराचे वतीने करण्यात आले, त्यानंतर मान्यवराचे हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले, यावेळी आमदार महेंद्र दळवी यांचे हस्ते श्रीफळ वाढवून तसेच नामफलकांचे अनावरण तसेच मान्यवरांचे हस्ते फित कापून जेएसडब्लू फांउडेशनच्या सौजन्याने उभारलेल्या चोरढे येथील महात्मा गांधी विदया मंदिर नुतन इमारतीचा उद्धाटन करण्यात आले.

# खोपोलीतील पेशवेकालीन विरेश्वर मंदिरात धाडसी चोरी; सीसीटीव्हीत चोरटे कैद

**खोपोली , खालापूर : प्रतिनिधी**



खोपोली शहरातील ऐतिहासिक आणि पेशवेकालीन भगवान विरेश्वर मंदिरात शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत सुमारे ११ किलो वजनाची, अंदाजे २१ ते २२ लाख रुपये किमतीची चांदीची पिंड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे खोपोली शहरात एकच खळबळ उडाली असून भाविकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

रविवारी पहाटे साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास मंदिरातील पुजारी व सेवक मंदिर उघडण्यासाठी गेले असता गाभाऱ्यातील चांदीची पिंड जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ही माहिती मंदिर विश्वस्त मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना दिली. खातरजमा केल्यानंतर विश्वस्त मंडळाने खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपासाला सुरुवात केली. मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता शनिवारी मध्यरात्री दोन अज्ञात व्यक्ती मंदिराच्या मागील बाजूच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी थेट गाभाऱ्यात प्रवेश करून चांदीची पिंड काढून नेल्याचे स्पष्टपणे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे.या चोरीचा तपास करण्यासाठी पोलीस विविध दिशांनी तपास करत असून सीसीटीव्ही फुटेज, स्वान पथक, तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्तचर यंत्रणेची मदत घेतली जात आहे. आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथकेही कार्यरत करण्यात आली आहेत.

खालापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल पाटील तसेच खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. "या प्रकरणाचा सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. संबंधित चोरट्यांना लवकरच ताब्यात घेतले जाईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या विरेश्वर मंदिरात झालेल्या या चोरीमुळे नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

# पोलीस हवालदाराच्या ‘द्या एक हात मदतीचा’ उपक्रमाने विद्यार्थ्यांची पायपीट थांबली

**पाली : प्रतिनिधी**



सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक क्रांतीचा एक अनोखा संगम सुधागड तालुक्यातील हातोंड पंचक्रोशीत पाहायला मिळाला. मुंबई पोलीस दलातील पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांच्या मागील १४ वर्षांपासून सुरू असलेल्या 'द्या एक हात मदतीचा' या सामाजिक उपक्रमाला मुंबईतील गोरेगाव येथील उन्नतनगर अक्षय को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीने मोलाची साथ दिली आहे. या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून परिसरातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ४५ सायकली, शालेय पाठ्यपुस्तकांचे संच आणि खाऊचे वाटप करण्यात आले.काही दिवसांपूर्वी राजेंद्र वाघमारे यांनी सोशल मीडियावर केलेल्या आवाहनाला सोसायटीचे कार्यवाहक विवेकानंद सावंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर सोसायटीचे चेअरमन कानमल जैन, मनिष जैन आणि मधुकर बनसोडे यांनी पुढाकार घेऊन सुमारे ४०० कुटुंबांच्या आर्थिक व वस्तू रूपातील मदतीतून या सायकली जमा केल्या व त्यांची योग्य दुरुस्ती करून घेतली. या सायकलींचे वाटप हातोंड, माठळ, कसईशेत आणि चंदरगांव येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व चंदरगांव माध्यमिक विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना करण्यात आले. यामुळे लांब अंतरावरून पायी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची पायपीट थांबून त्यांचा वेळ अभ्यासासाठी वाचणार आहे.

# युनिकेम, साधना कंपनीची प्रदूषण मंडळ व एमआयडीसीकडून सखोल चौकशी करा -खासदार तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**



रोहा तालुक्यात ५ जुलै रोजी अतिवृष्टीमुळे कुंडलिका नदीला पुर आला होता.त्यावेळी एमआयडीसी मधील कारखान्यातील रसायनयुक्त सांडपाणी रोठखुर्द, रोठ बुद्रुक, वरसे, भुवनेश्वर, निवी परीसरात गेल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले होते.या शेतीचे ताबडतोब पंचनामे करण्याच्या सुचना देत कामगारांवर अन्याय करणाऱ्या धाटाव औद्योगिक क्षेत्रातील युनिकेम व साधना कंपनीचे प्रदुषण मंडळ व एमआयडीसी मार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश खा.सुनील तटकरे यांनी शनीवारी आढावा बैठकीत दिले.

यावेळी जिप उपाध्यक्ष मधुकर पाटील, सभापती विजया पाशिलकर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपसभापती संजय मांडलुस्कर, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, अलिबाग विधानसभा कार्याध्यक्ष मनोजकुमार शिंदे, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, कार्याध्यक्ष समिर शेडगे, शहर अध्यक्ष अमित उकडे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन सह नगरपरिषदेचे सभापती, गटनेते,नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, विविध खात्यांचे शासकीय अधिकारी, नागरीक उपस्थित होते.

या बैठकीत खा.सुनील तटकरे यांनी अतिवृष्टी पार्श्वभूमीवर रोहा, वरसे, भुवनेश्वर, निवी यांचे पंचनामे पुर्ण करावे.घरे, दुकाने व हॉटेल नुकसानीचे १ कोटींची मदत जमा झाली आहे.अतिवृष्टी गैर फायदा घेत रसायनयुक्त पाणी काही कारखान्यातुन आल्याने हे पाणी शेतात गेले आहे.त्यामुळे मोठे नुकसान शेतीचे झाले आहे. या शेतीचे पंचनामे कृषी विभागाने करावे व एमआयडीसी व प्रदुषण मंडळाने याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे खा.सुनील तटकरे यांनी सांगितले.

या बैठकीत स्थानिक कामगारांवरील अन्याय सहन केले जाणार नाही त्यामुळे या दोन्ही कंपनीची प्रदुषण मंडळ व एमआयडीसी मार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश खा.सुनील तटकरे यांनी दिले.

# माणगाव ग्रामीण पतसंस्थेतर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**




सहकार क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल ता.माणगाव या संस्थेतर्फे सन. २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात दहावी,बारावी,पदवी,पदविका,शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासद पाल्यांचा (विद्यार्थ्यांचा )गुणगौरव सोहळा शनिवार दि.१८ जुलै रोजी झाला.

संस्थेचे चेअरमन आनंद यादव तसेच संचालक दिलीप जाधव, नरेश राजपूत,उदय म्हशीलकर,संदीप खरंगटे,दिप्ती मोरे,अरुण प्रभाळे यांच्याहस्ते व प्रमुख उपस्थितीत तसेच संस्थेचे हितचिंतक ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी राजेंद्र धारिया,माजी नगरसेवक जयंत बोडेरे,जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे,अलीभाई यतिनमणी,माजी सरपंच सुरेश टेंबे,गजानन जाधव,संतोष यादव,लक्ष्मण जगताप,पांडुरंग जाधव ,अजित हुजरे,नरेश येलगे, सभासद,ठेवीदार,खातेदार,व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड,सर्व कर्मचारीवृंद,पालकवर्ग,स्वल्पबचत प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

सदर गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात संस्थेच्या प्रगतीचा आलेख उपस्थित सर्वांसमोर ठेवीत आपला पुढील वर्षाचा विद्यार्थी गुणगौरव सोहळा संस्थेच्या नवीन प्रशस्त जागेत होईल असे सांगत सर्व गुणवंत विध्यार्थ्यांना संस्थेतर्फे शुभेच्छा दिल्या.

यावेळी पतसंस्थेतर्फे स्वरा मसुरे( बीटीएस),अभय जाधव (डिग्री),आदित्य शेडगे (बॅचलर इन फाईन आर्ट), नीरजा जगताप (शिष्यवृत्ती),स्वामींनी यादव (शिष्यवृत्ती),श्रुती हुजरे (बीएससी ), इयत्ता बारावी उत्तीर्ण आनम शेख,सायली मोरे,पार्थ परमार,रुची तळकर, सिद्रा परदेशी,अवधूत जाधव,संस्कार पालकर,तन्वी गुगले,वेदांत केकाणे,अद्वेत ताठरे,राधा अंबुर्ले, नहुश भोनकर,तनिषा मेथा,श्रेया म्हशेलकर,नीलम गावडे इयत्ता दहावीतील उत्तीर्ण तनिष्का टेंबे,अक्षरा खरे,श्रवण गायकवाड,पारस जगताप, स्वयम कदम, हरमायनी येरूणकर,आयुष अहिरे,लालसाब अल्लाबक्ष यतीनमणी,साजिरी गायकवाड, सोहम जाधव, अन्वी बुटे, किर्ती नंदकुमार नंबियार(शेट्टी), जान्हवी जैन,मानस जैन,अर्पिता शिर्के,रेयांश शिंदे,शमिका जाधव आदी ३८ गुणवंत विद्यार्थ्यांचा आकर्षक सन्मान चिन्ह, रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

# रोह्यात विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



**रोहे : प्रतिनिधी**

दरवर्षी ग्रामीण व शहरातील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त करीत असतो.खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थीचे शिक्षणाचे स्तर वाढविण्यासाठी आमचे नेहमीच उपक्रम असतात. रोहयात उद्या ( १९ ) संगीत पर्वाला सुरुवात होत असून रोह्यात संगीत अकादमी सुरू करण्यात येत आहे.रोहा शहर व रोहा तालुक्यातील शिक्षणाचा दर्जा अधिका अधिक उंचविण्यासाठी खा.सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणार आहोत. भविष्यात रोहयातुन युपीएससी, एमपीएससी मध्ये विद्यार्थी यावा अशी अपेक्षा आहे.असे महीला व बालकल्याण मंत्री ना.आदिती तटकरे यांनी व्यक्त केले

खा.सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त ना.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून शालेय क्रीडा स्पर्धा, रंगभरण स्पर्धा व महीलांच्या पाककला स्पर्धातील विजेत्या स्पर्धकांचा भव्य बक्षिस वितरण समारंभ व विद्यार्थ्यांना छत्री वाटप कार्यक्रमाप्रसंगी डॉ चिंतामणराव देशमुख सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात ना. आदिती तटकरे बोलत होत्या.यावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, माजी नगराध्यक्ष समिर शेडगे, शहर अध्यक्षा प्राजक्ता चव्हाण, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे, , रवी चाळके, गट नेते महेंद्र गुजर, अजित मोरे, संजना शिंदे, पुर्वा मोहीते, आल्मास मुमैरे, गौरी बारटक्के, माज सवाल, समिक्षा बामणे, अलिम मुमैरे, प्रेषित बारटक्के, स्वप्नील धनावडे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविकात समिर शेडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने १० जुलै वाढदिवसाच्या निमित्ताने रोहा शहरात विविध उपक्रम घेण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे क्रिडा स्पर्धा, महीलांचे कार्यक्रम आदी उपक्रमाचे बक्षिस वितरण कार्यक्रम घेण्यात येत असून खा.सुनील तटकरे, ना.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून शाळेसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या घोडींदे यांनी केले.यावेळी रोहेकर नागरीक, शिक्षक, राष्ट्रवादी कार्यकर्ते, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुरुड : सतत पाऊसामुळे मुरुडचा खरआंबोळी डॅम भरून वाहूलागला आहे आज रविवार पर्यटकांनी गर्दी केली पोलीस सावधानता बाळगण्याचे आव्हान करत आहेत** (छाया. सुधीर नाझरे)

# जपानमध्ये फडकला तिरंगा!

## पी. व्ही. सिंधूने रचला इतिहास

### जपान ओपन जिंकणारी ठरली पहिली भारतीय महिला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने जपान ओपन सुपर ७५० स्पर्धेत अफलातून कामगिरी करत इतिहास रचला आहे. अंतिम फेरीत तिने जपानच्या आणि माजी विश्वविजेत्या अकेन यामागुचीवर मिळवलेल्या धडाकेबाज विजयामुळे सिंधूच्या कारकिर्दीचे जणू दुसरे पुनरागमन झाले आहे. तिने आपली संपूर्ण ताकद आणि आक्रमकता पणाला लावून आपल्या या कट्टर प्रतिस्पर्ध्याचा २१-१७, २१-१७ अशा अंकांनी पराभव केला आणि 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले आहे.

पी. व्ही. सिंधूने आपल्या या देदीप्यमान कामगिरीने देशासह क्रीडाविश्वात मोठा आनंदाचे वातावरण आहे. या कामगिरीने तिच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा विजय मिळवला असल्याचे बोलले जात आहे. या विजयासह सिंधू जपान ओपनचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

दरम्यान, पी. व्ही. सिंधूला तिच्या या पूर्वीच्या खेळात कट्टर प्रतिस्पर्धी समजल्या जाणाऱ्या अकाने यामागुने अनेकदा विजेतेपदांपासून वंचित ठेवले आहे, ज्याची सल सिंधूच्या मनात कायम दिसून आली आहे. अशातच रविवारी ३१व्या वर्षी यामागुचीवर मिळवलेल्या धडाकेबाज विजयामुळे सिंधूच्या कारकिर्दीचे जणू दुसरे पुनरागमन झाले. तिने आपली संपूर्ण ताकद आणि आक्रमकता पणाला लावून 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले आहे. तर जपानमध्ये एखादे मोठे विजेतेपद जिंकणारी सिंधू पहिली भारतीय खेळाडू ठरली. टोकियो ऑलिम्पिक २०२१ मधील उपांत्यपूर्व फेरीतील विजयाची पुनरावृत्ती करत तिने आपल्या कारकिर्दीच्या '३.०' टप्प्यातील यशाची नांदी केली.

दरम्यान, यामागुचीने यापूर्वी उंच 'टॉसेस' आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर सिंधूला अनेकदा अडचणीत आणले होते, मात्र रविवारी सिंधूने यामागुचीचा तो खंबीर प्रतिकार मोडून काढला, ज्याने तिला अनेकदा रोखले होते आणि गेल्या काही वर्षांत ज्याची उणीव भासत होती, असा एक अत्यंत वर्चस्वपूर्ण विजय तिने नोंदवला. या कामगिरीमुळे 'एलए ऑलिम्पिक'मध्ये महिला एकेरीत भारताकडून प्रबळ दावेदारीची अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे.

सिंधूने यापूर्वी २०२४ मध्ये सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेत विजेतेपद पटकावले होते. २०१९ मध्ये जागतिक चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर जपान ओपनमधील हा विजय तिचा सर्वात मोठा विजय आहे. हे सिंधूचे सर्वात मोठे टूर विजेतेपद होते. यापूर्वी तिने २०१८ मध्ये वर्ल्ड टूर फायनल्स आणि २०१६ मध्ये चायना ओपन जिंकले होते. यामागुचीने तिला २०१९ इंडोनेशिया सुपर १००० फायनल आणि २०१९ सुपर सिरीज फायनल्ससह अनेक मोठ्या प्रसंगी पराभूत केले होते, पण या विजयामुळे तिला तिच्या जागतिक चॅम्पियनशिपमधील विजयाची आठवण झाली, जिथे तिने आपल्या प्रतिस्पर्ध्याला मोठ्या फरकाने पराभूत केले होते.

# फिफा विश्वचषकात इंग्लंडने साकारला दमदार विजय

### फ्रान्सवर ६-४ने मात करीत पटकावले तिसरे स्थान

**मायामी : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषकातील तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या रंगतदार सामन्यात इंग्लंडने फ्रान्सचा ६-४ असा पराभव करत स्पर्धेतील तिसरे स्थान मिळवले. गोलांनी भरलेल्या या सामन्यात इंग्लंडच्या आक्रमक खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, तर फ्रान्सनेही शेवटपर्यंत जोरदार लढत दिली.

सामन्याच्या सुरुवातीलाच इंग्लंडने आक्रमक पवित्रा घेतला. डेक्लन राइसने तिसऱ्या मिनिटाला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर एझरी कोन्साने हेडरद्वारे दुसरा गोल केला. बुकायो साकानेही उत्कृष्ट कामगिरी करत सलग गोल केले आणि इंग्लंडने पहिल्या सत्रात मोठी आघाडी घेतली.

फ्रान्सने दुसऱ्या सत्रात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. किलियन एम्बाप्पेने दोन गोल करत संघाला सामन्यात परत आणण्याचा प्रयत्न केला. मायकल ओलिसे व इतर खेळाडूंनीही आक्रमक खेळ केला, मात्र इंग्लंडचा गोलरक्षक डीन हेंडरसनने बचाव करत संघाची आघाडी कायम राखली.

बुकायो साकाने पेनल्टीवर गोल करत हॅट्ट्रिक पूर्ण केली. इंग्लंडच्या ज्यूड बेलिंगहॅमनेही महत्त्वाचा गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह इंग्लंडने विश्वचषकातील उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली.



# एम्बाप्पेची ऐतिहासिक कामगिरी

### गोल्डन बूटच्या शर्यतीत मेस्सीला टाकले मागे

**मियामी : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ मधील तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात इंग्लंडने ६-४ने फ्रान्सवर दणदणीत विजय मिळवला आहे, मात्र या सामन्यात फ्रान्सचा कर्णधार किलियन एम्बाप्पेने दोन गोल आणि एक असिस्ट करत वैयक्तिक पातळीवर इतिहास रचला. त्याने यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत मेस्सीला मागे टाकत सर्वाधिक गोल केले आहेत.

एम्बाप्पेने या सामन्यात दोन गोल आणि असिस्ट करत विश्वचषकाच्या इतिहासात आपले नाव नोंदवले आहे. आता एम्बाप्पेने दोन गोल करत नावावर स्पर्धेत एकूण १० गोल झाले असून त्याने आठ गोल करणाऱ्या लिओनेल मेस्सीला मागे टाकत गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडी घेतली आहे. इतकेच नव्हे तर एम्बाप्पेने विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक गोल करण्याचा विक्रमही आपल्या नावे केला आहे. तो



आतापर्यंत तीन विश्वचषक स्पर्धेचा भाग राहिला आहे. यात त्याने केवळ २२ सामन्यांत २२ गोल केले आहेत, तर त्याच्या मागे लिओनेल मेस्सी आहे. मेस्सीने ३३ सामन्यांत २१ गोल केले आहेत.

वर्ल्डकपच्या तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात इंग्लंडने पहिल्या हाफमध्येच ४-० अशी भक्कम आघाडी घेतली होती. डेक्लन राईस, एझरी कॉन्सा व बुकायो साकाच्या गोलांच्या जोरावर इंग्लंडने फ्रान्सला धक्का दिला. फ्रान्सचा पराभव निश्चित होता, मात्र दुसऱ्या हाफमध्ये फ्रान्सने सामन्यात दमदार पुनरागमन करत चार गोल केले. एम्बाप्पेने ४८व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. ब्रॅडली बारकोलाने गोल करत फरक कमी केला.

एम्बाप्पेने पुन्हा एकदा ६६व्या मिनिटाला आणखी एक गोल करत संघाला चांगली लय मिळवून दिली होती. एम्बाप्पेने आणि फ्रान्सच्या आक्रमक खेळामुळे इंग्लंडवर दबाव वाढला होता. मात्र, अखेरीस इंग्लंडने ६-४ असा विजय मिळवला.

# किंग खानच्या संघाचा एमएलसीमध्ये ऐतिहासिक विजय!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मेजर लीग क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामना लॉस एंजेलिस नाईट रायडर्स आणि वॉशिंग्टन फ्रीडम या दोन्ही संघांमध्ये पार पडला. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या सामन्यात लॉस एंजेलिस नाईट रायडर्स संघाने एका धावेने विजय मिळवून इतिहासाला गवसणी घातली आहे. शाहरुख खान सह-संघमालक असलेल्या या संघाने पहिल्यांदाच मेजर लीग क्रिकेट स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरले आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लॉस एंजेलिस संघाने २० षटकांअखेर १६४ धावा केल्या होत्या. फलंदाजीत दमदार कामगिरी केल्यानंतर धावांचा बचाव करताना गोलंदाजांनीही दमदार गोलंदाजी केली. वेगवान गोलंदाज जेसन होल्डर आणि फिरकी गोलंदाज सुनील नरेन यांनी प्रत्येकी ३-३ गडी बाद केले. या दोघांनी मिळून ६ विकेट घेतले आणि वॉशिंग्टन फ्रीडम संघाच्या फलंदाजी आक्रमणाचे कंबरडे मोडले, पण हा विजय सहज




मिळवता आलेला नाही. हा विजय लॉस एंजेलिस संघासाठी अतिशय खास ठरला. कारण शाहरूख खान संघमालक असलेल्या या संघाने पहिल्यांदाच मेजर लीग क्रिकेट स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला आहे.

या सामन्यात लॉस एंजेलिसच्या अनुभवी खेळाडूंनी पहिल्या आणि ऐतिहासिक विजयात मोलाची भूमिका बजावली आहे. सुनील नरेनने आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा घेतला. या दमदार गोलंदाजीच्या बळावर त्याची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली आहे. यासह संपूर्ण स्पर्धेतही त्याच्या गोलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. या संपूर्ण स्पर्धेत त्याने एकूण १८ गडी बाद केले. या कामगिरीच्या बळावर त्याची प्लेअर ऑफ द टूर्नामेंट म्हणून निवड करण्यात आली. गोलंदाजीसह फलंदाजीतही त्याने दमदार कामगिरी केली. फलंदाजी करताना त्याने एकूण २०४ धावा केल्या.

लॉस एंजेलिस संघाकडून फलंदाजी करताना आंद्रे फ्लेचरने सर्वाधिक ४७ धावा केल्या होत्या. तर कॉलिन मुनरोने ४० धावा केल्या. या खेळीच्या बळावर लॉस एंजेलिसने २० षटकांअखेर १६४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना वॉशिंग्टन फ्रीडम संघाकडून ओबस पिएनारने सर्वाधिक ५३ धावांची खेळी केली.

# रोहित-विराट जोडीचा पराक्रम

### ४०० आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळणारी ठरली पहिली भारतीय जोडी



**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट विश्वातील दोन दिग्गज फलंदाज कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली या जोडीने रविवारी (दि. १९) लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर इंग्लंडविरुद्ध मैदानात उतरताच एका नव्या इतिहासाला गवसणी घातली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकत्र ४०० सामने खेळण्याचा टप्पा पार करणारी ही पहिलीच भारतीय जोडी ठरली आहे. भारतासाठी सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळण्याचा विक्रम या जोडीच्या नावावर आधीपासूनच नोंदवला गेला आहे.

यापूर्वी हा विक्रम महान फलंदाज सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांच्या नावावर होता, ज्यांनी एकत्र ३९१ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते. आता रोहित-विराट जोडीने त्यांना मागे टाकत अव्वल स्थान अधिक मजबूत केले आहे. जागतिक क्रिकेटचा विचार केला तर एकत्र सर्वाधिक सामने खेळण्याचा विक्रम श्रीलंकेच्या कुमार संगकारा आणि महेला जयवर्धने यांच्या नावावर आहे. या दिग्गज जोडीने ५५० सामन्यांमध्ये एकत्र सहभाग घेतला होता. त्यांच्यापाठोपाठ श्रीलंकेचेच तिलकरत्ने दिलशान आणि महेला जयवर्धने यांची जोडी ४२६ सामन्यांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

या जागतिक यादीत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची जोडी आता ४०० सामन्यांसह सातव्या क्रमांकावर पोहोचली आहे. भारतीय क्रिकेटच्या या दोन्ही आधुनिक महानायकांनी जवळपास एकाच कालखंडात आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. रोहित शर्माने २००७ मध्ये आणि विराट कोहलीने २००८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. १८ वर्षांहून अधिक काळ दोन्ही खेळाडू भारतीय फलंदाजीचे मुख्य आधारस्तंभ राहिले. दोन्ही दिग्गजांनी टी-२० व कसोटीमधून निवृत्ती स्वीकारली असून सध्या ते केवळ एकदिवसीय स्वरूपातच भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत.



## लिओनेल मेस्सीचा महागडा डावा पाय!

**म्युनिच : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६च्या अंतिम सामन्याच्या पार्श्वभूमीवर अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आता ही चर्चा त्याच्या जादुई डाव्या पायाच्या अद्भुत किमतीची आहे. विविध आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार मेस्सीच्या डाव्या पायाचा तब्बल ७५० दशलक्ष युरो म्हणजेच सुमारे ९०० दशलक्ष डॉलर्सचा विमा काढण्यात आला आहे. भारतीय चलनात ही रक्कम तब्बल ६,९०० ते ७,५०० कोटी रुपयांच्या घरात जाते. क्रीडा क्षेत्राच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूच्या शरीराच्या भागासाठी काढण्यात आलेली ही आजवरची सर्वात मोठी आणि महागडी विमा पॉलिसी आहे.

मेस्सीच्या या डाव्या पायाची किंमत जगातील अनेक ऐतिहासिक वास्तू आणि लक्झरी मालमत्तांपेक्षाही कितीतरी पटीने जास्त आहे.

### राष्ट्रकुल खेळांच्या उद्घाटन सोहळ्यासाठी

# मीराबाई चानू भारताची ध्वजवाहक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू आणि लव्हलिना बोरगोहेन यांची ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल खेळांच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताच्या ध्वजवाहक आणि मशालवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने ही घोषणा केली. मर्यादित स्वरूपात आयोजित करण्यात येत असलेल्या या बहुक्रीडा स्पर्धेची सुरुवात २३ जुलै रोजी उद्घाटन सोहळ्याने होईल.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी मीराबाई चानू आणि लव्हलिना बोरगोहेन यांच्या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, "मीराबाई आणि लव्हलिना ओव्हो हायड्रो येथे हा सन्मान स्वीकारणार आहेत, ही अभिमानाची बाब आहे. मी दोन्ही खेळाडूंना आणि संपूर्ण भारतीय पथकाला शुभेच्छा देते." त्यांनी पुढे सांगितले की, उद्घाटन सोहळ्यासाठी भारतीय संघात दोन महिला खेळाडूंची निवड होणे ही अभिमानाची बाब आहे. दोन्ही खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे






आणि सध्या त्या ब्रिटनमध्ये होणाऱ्या खेळांची तयारी करत आहेत.

मीराबाई चानू ८ ऑगस्ट रोजी ३२ वर्षांची होईल. ती जवळपास एक दशकापासून भारताच्या आघाडीच्या वेटलिफ्टर्सपैकी एक आहे. मीराबाईने २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ४९ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकले. त्यानंतर तिने २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिला आपल्या पूर्वीच्या कामगिरीची पुनरावृत्ती करता आली नसली तरी, ग्लासगोमध्ये भारताच्या पदकासाठी ती एक प्रबळ दावेदार आहे.

तिने जागतिक चॅम्पियनशिपमध्येही अनेक पदके जिंकली आहेत. लव्हलिना बोरगोहेनने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकले. त्यानंतर तिने २०२३च्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण पदक जिंकले. लव्हलिनाने २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदकही जिंकले. ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतही ती भारतासाठी चांगली कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे. दरम्यान, यामुळे निश्चितच मीराबाई चानूचा आत्मविश्वास वाढला आहे.

# वैभव सूर्यवंशी झिम्बाब्वेला रवाना

### फटकेबाजी पाहण्यासाठी चाहते आतुर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यातील निराशाजनक कामगिरी विसरून भारतीय टी-२० क्रिकेट संघ आता आपल्या पुढच्या मोहिमेसाठी सज्ज झाला आहे. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात या महिन्यांत तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. या दौऱ्यासाठी भारतीय संघ १९ जुलैला जिम्बाब्वेसाठी रवाना झाला. या दौऱ्यातही १५ वर्षांचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीवरच लक्ष असणार आहे. 'बेबी बॉस' वैभव इंग्लंड दौऱ्यात फारशी छाप पाडू शकला नाही, पण आता आगामी टी-२० मालिकेत तो धमाका करेल, अशी सर्वच भारतीयांना आशा आहे.

नियमित मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर सध्या इंग्लंडमध्ये असल्याने त्याच्या अनुपस्थितीत व्हीव्हीएस लक्ष्मण या दौऱ्यात भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची हंगामी जबाबदारी सांभाळत असून तो संघासोबत रवाना झाला आहे. भारतीय संघाचा टी-२० कर्णधार श्रेयस अय्यर, ईशान किशन, शिवम दुबे, हर्ष दुबे आणि प्रिन्स यादव हे खेळाडू इंग्लंड दौरा संपवून थेट झिम्बाब्वेमध्ये दाखल होणार आहेत आणि संघात सामील होणार आहेत.



**भारतीय संघ** : श्रेयस अय्यर (कर्णधार), वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा (उपकर्णधार), ईशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, सूर्यांश शेडगे, रिंकू सिंह, हर्ष दुबे, रवी बिश्नोई, प्रिन्स यादव, यश ठाकूर, अशोक शर्मा, मयंक यादव आणि प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक).

भविष्यातील संघ तयार करण्याच्या दृष्टीने निवडकर्त्यांनी काही युवा खेळाडूंना संधी दिली आहे. यश ठाकूर आणि अशोक शर्मा यांचा पहिल्यांदाच भारतीय संघात समावेश झाला आहे. याशिवाय मयंक यादव आणि रिंकू सिंह यांच्या पुनरागमनावरही क्रीडाप्रेमींचे लक्ष असेल. हर्ष दुबे आणि प्रभसिमरन सिंग यांना टी-२० आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळू शकते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com